# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ


डिसेंबर २०२५

# विद्यावार्ता

ई - मासिक

## आविष्कार


### - विशेषांक -















# विद्यावार्ता

ई - मासिक



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ


मार्गदर्शक

**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र- कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रकाशक

**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संपादक

**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

https://www.sgbau.ac.in


# अनुक्रमणिका


- विद्यापीठात आविष्कार स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न — १
- विद्यापीठात ज्युनियर हॅकेथॉन स्पर्धेचे उद्घाटन — ४
- ज्युनियर हॅकेथॉन स्पर्धकांना पुरस्कार प्रदान — ७
- माझी संकल्पना सर्वोत्कृष्ठ संकल्पना कार्यक्रम — ९
- बेघर बांधवांच्या मदतीसाठी विद्यापीठ सदैव तत्पर — ११
- विद्यापीठात भ्रष्टाचार विरोधी दिन व मानवाधिकार दिन संपन्न — १२
- राष्ट्रीय एकात्मता शिबिराकरिता स्वयंसेवकांची निवड — १३
- जीवनाचे प्रभावी व्यवस्थापन वर कार्यशाळा — १४
- डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमाला संपन्न — १५
- बिझिनेस प्लॅन स्पर्धा — १७
- विद्यापीठात महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन — १८
- विद्यापीठात संत गाडगेबाबा पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न — २०
- संस्कृत विभागात वेदांचा सामान्य परिचय पुस्तकाचे विमोचन
- संस्कृत विभागाचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत — २१
- कर्तव्यपूर्ती सोहळा संपन्न — २२
- विद्यापीठात वीर बाल दिवसाचे आयोजन — २५
- जयंती विशेष — २६
- विविध स्पर्धेकरिता विद्यापीठाचे संघ घोषित — २८
- बातमी कात्रणे — ३३




# विद्यार्थ्यांनो ! आपल्या नवकल्पानांना प्रत्यक्षात उतरवा - कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे
# विद्यापीठात 'आविष्कार' स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन

## नवसंशोधक विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मॉडेल्सचे सादरीकरण



आविष्कार स्पर्धेचे फित कापून उद्घाटन करतांना मान्यवर



संशोधनासाठी अनेक क्षेत्रे खुली आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील नवकल्पनांना केवळ विचारांपुरते मर्यादित न ठेवता, त्यांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्नशील राहावे. 'अविष्कार' स्पर्धा हे अशा सर्जनशील विचारांसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांनी आपले संशोधन समाजासाठी उपयुक्त कसे ठरेल, याकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे, असे प्रतिपादन जी. एच. रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील अविष्कार सेल तर्फे आयोजित विद्यापीठ स्तरीय 'आविष्कार' स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

अविष्कार स्पर्धेचे उद्घाटन झाल्याची घोषणा करुन डॉ. विनायक देशपांडे पुढे म्हणाले, तत्कालीन कुलपती कृष्णा यांनी ही स्पर्धा महाराष्ट्रात सुरू केली आणि त्यानंतर या उपक्रमाला मिळालेली गती यामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मोठी चालना मिळाली आहे. आजच्या तरुणांकडे संशोधनात्मक कल्पनांची कमतरता नाही, गरज आहे ती कठोर परिश्रमांची आणि सातत्याची. संशोधन हे केवळ पीएच.डी. मिळवण्यापुरते मर्यादित नसावे, तर त्यातून दर्जेदार जीवन जगण्यासाठी मार्ग सुकर व्हावा, असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी एलन मस्क यांच्या यशाचे उदाहरण देतांना सूक्ष्म निरीक्षण आणि समाजाच्या गरजा ओळखून संशोधन करण्याचे आवाहन केले. तसेच बिहारमधील मोहम्मद सैदुल्ला यांनी नदी ओलांडण्यासाठी तयार केलेल्या 'पाण्यावर चालणा-या सायकल'चा दाखला देत, गरज हीच संशोधनाची जननी असल्याचे स्पष्ट केले.एरोबोटिक्स आणि आर्टिफिशिअल इंटेलिजन्स बाबत बोलताना ते म्हणाले की, तंत्रज्ञान मानवाची जागा घेऊ शकत नाही, परंतु ते मानवी कामे अधिक सुलभ करते. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर करून नवनवीन प्रयोग करावेत.



मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते






विद्यार्थ्यांच्या संशोधन मॉडेल्सची पाहणी करतांना मान्यवर

कार्यक्रमात डॉ. प्रवीण उपरे यांनी दक्षिण कोरियातून ऑनलाइन माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी पीपीटी प्रेझेंटेशनद्वारे 'संशोधन विषयाची निवड' यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कोअर नॉलेज आणि लॅब स्किल्स : संशोधनासाठी मूलभूत ज्ञान आणि प्रयोगशाळेतील कौशल्ये किती महत्त्वाची आहेत, हे त्यांनी पटवून दिले. विद्यार्थ्यांनी स्वतःमधील कौशल्ये ओळखून, समाजाला फायदेशीर ठरेल अशा विषयांत करिअर करावे, असा सल्ला त्यांनी दिला. केवळ संशोधन करून चालणार नाही, तर ते जगासमोर मांडण्यासाठी उत्तम संवाद कौशल्य विकसित करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

संशोधन व नवोपक्रम हा अर्थव्यवस्थेचा कणा–कुलगुरू

अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, शेतकरी आत्महत्येसंदर्भात विद्यापीठाने संशोधन प्रकल्प हाती घेतला आहे व या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकरी आत्महत्येच्या घटनांना कमी करण्याचे प्रयत्न होतील. आविष्कार हा राज्यपाल अभिमित प्रकल्प आहे व राज्यभरातील कुलगुरूंच्या होणा–या सभांमध्ये राज्यपालांकडून आविष्कारची आवर्जून माहिती घेतली जाते. त्यामुळे आविष्कार हा संशोधनाचा उत्सव असून कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा हा संशोधन व नवोपक्रम हाच आहे. त्यामुळेच हा प्रकल्प राज्यभरात सुरू करण्यात आला आणि ज्या देशांना आपण प्रगत राष्ट्र असे संबोधतो, त्यां देशांच्या विकासामागे संशोधन, नवोपक्रम आहे. भारतातही आता संशोधन आणि नवोपक्रमाला मोठ्या प्रमाणात वाव मिळत असून भारताची प्रगतीपथाकडे वाटचाल सुरू आहे व यात विद्यार्थ्यांची जबाबदारी सुध्दा अधिक वाढली आहे. उद्याचे भविष्य हे विद्यार्थीच असल्याने ही जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारावी. विद्यापीठस्तरीय आविष्कारमधून राज्यस्तरावर जाणा–या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतांना ज्यांची निवड होणार नाही, त्यांनी निराश न होता आपल्या संशोधनाची दृष्टी वाढवावी. परंतु असे करित असतांना कोणतेही संशोधन हे समाज, राष्ट्राच्या हिताचे असावे, त्याशिवाय ते शुन्य आहे, असे आवाहन कुलगुरूंनी याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना केले.

संशोधन स्पर्धा प्रदर्शनीचे फित कापून उद्घाटन

नवसंशोधक विद्यार्थ्यांच्या मॉडेल्सचे सादरीकरण पाहुन मान्यवरांनी केली प्रशंसा





विद्यार्थ्यांच्या संशोधन मॉडेल्सची पाहणी करतांना मान्यवर

नवसंशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या नवनवीन कल्पनांना आकार देवून तयार केलेल्या मॉडेल्सचे भौतिकशास्त्र विभागाच्या सभागृहामध्ये सादरीकरण करण्यात आले. जी.एच. रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांनी फित कापून प्रदर्शनीचे उद्घाटन केले. यावेळी कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, माजी प्र–कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड आदींनी विद्यार्थ्यांच्या मॉडेल्सची पाहणी करुन त्यांच्याशी संवाद साधत नवसंशोधक विद्यार्थ्यांची प्रशंसा केली. तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मॉडेल्सच्या उपयोगिततेबाबत माहिती घेतली.

माता सरस्वती, संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन करुन राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सूत्रसंचालन प्रा. मेघा कोटक, स्वागतपर भाषण व पाहुण्यांचा परिचय डॉ. नीरज घनवटे यांनी करुन दिला. प्रास्ताविकामधून आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांनी स्पर्धेच्या आयोजनामागील हेतू स्पष्ट केला. आभार डॉ. सुजाता काळे यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, संशोधक, पाचही जिल्ह्यांमधील विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# विद्यापीठाच्या ज्युनियर हॅकेथॉन-२०२५ मध्ये विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला पंख-कुलगुरू शालेय विद्यार्थ्यांचा भरभरुन प्रतिसाद

## विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध विषयावरील संशोधन मॉडेल्सचे प्रदर्शन



प्रदर्शनीचे फित कापून उद्‌घाटन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

शालेय वयातच विद्यार्थ्यांनी कल्पनाशक्तीपलिकडे तयार केलेल्या विविध विषयांवरील संशोधन मॉडेल्स पाहून विद्यार्थ्यांच्या कल्पनांना पंख फुटले असा एकंदरीत सूर प्रदर्शनीमधील मॉडेल्स पाहून निघाला. त्यामुळे शालेय विद्यार्थी भविष्यात निश्चितच उंच भरारी घेतील, हे निश्चित. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पुढाकारातून शालेय विद्यार्थ्यांसाठी 'ज्युनियर हॅकेथॉन–२०२५' चे आयोजन करण्यात आले. इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेला भरभरुन प्रतिसाद देत आपापल्या कल्पनांनी तयार केलेली विविध विषयांवरील संशोधन मॉडेल्स यावेळी सादर करण्यात आलीत. प्रदर्शनीचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते झाले. यावेळी महानगरपालिकेच्या आयुक्त डॉ. सौम्या शर्मा (चांडक) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, डॉ. सौम्या शर्मा (चांडक) यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेली संशोधन मॉडेल्स पाहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांच्या मॉडेल्सची माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांनी सुध्दा संशोधन मॉडेल्स कशी आणि किती फायदेशीर आहेत, त्यांच्या मॉडेल्सचे उपयोग यावेळी मान्यवरांना सांगितले.

विद्यापीठ अंतर्गत असलेल्या इन्क्युबेशन सेंटर व मेधावाटिका स्टार्टअप यांच्या संयुक्त विद्यमाने ही ज्युनियर हॅकेथॉन–२०२५ स्पर्धा आयोजित करण्यात आली. त्यासाठी टेक्नॉलॉजी ॲन्ड डिजिटल इन्नोव्हेशन, एन्व्हार्यमेंट ॲन्ड सस्टेनबिलिटी, हेल्थ ॲन्ड बेलबिइंग, ओपन थिम असे विषय ठेवण्यात आले होते. इयत्ता ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेली विविध विषयांवरील मॉडेल्स सादर केलीत. यावेळी इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव, इन्क्युबेशन सेंटरचे सर्व अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

### अमरावतीत आय.टी. पार्क व्हावा–आयुक्त

या कार्यक्रमारम्यान शहराच्या विकासाच्या दृष्टीने एक महत्वाची चर्चा झाली. मनपा आयुक्त सौम्या शर्मा (चांडक) यांनी अमरावतीत आय.टी. पार्क काळाची गरज असल्याचे सांगून शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना प्रगल्भ बनविणे गरजेचे आहे. त्यामुळे भविष्यात ते आपले उज्ज्वल जीवन घडवू शकतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. तर कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सुध्दा आय.टी. पार्कसाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगून शासनाकडे सुध्दा याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यात आला असल्याचे सांगितले. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर यांनीही यावेळी मनपा आयुक्त यांना उपक्रमांबाबतची माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या संशोधन मॉडेल्सची पाहणी करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यावेळी संशोधन मॉडेल्सबाबत त्यांनी माहिती जाणून घेतली








मनपा आयुक्त डॉ. सौम्या शर्मा (चांडक)विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या संशोधन मॉडेल्सची पाहणी करतांना

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या संशोधन मॉडेल्सची पाहणी करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यावेळी संशोधन मॉडेल्सबाबत त्यांनी माहिती जाणून घेतली







# विद्यापीठाच्या ज्युनियर हॅकेथॉनमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना पुरस्कार

## आजचे विद्यार्थी हे उद्याचे संशोधक व उद्योजक - प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे



मार्गदर्शन करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

आजचे विद्यार्थी हे उद्याचे संशोधक आणि उद्योजक आहेत आणि अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील समस्या सोडवण्याची क्षमता विकसित होते, असे प्रतिपादन अध्यक्षीय भाषणातून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील इन्क्युबेशन फाऊंडेशन, आय.क्यू.ए.सी. व मेधावाटिका ॲडलॅब्स प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित ज्युनियर हॅकेथॉनमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांच्या बक्षिस वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता अमरावतीचे उपायुक्त श्री. द. ल. ठाकरे, इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्यात.

ज्युनियर श्रेणीमध्ये श्री समर्थ हायस्कुल, अमरावतीचे विद्यार्थी समर्थ देवगिरीकर, तुषार सोपान काजे यांना प्रथम व ३ हजार रुपये रोख, शिवाजी मल्टीपर्पज उच्च माध्यमिक शाळेचे विद्यार्थी अद्वेता चौधरी, सोहम माहुलकर द्वितीय व २ हजार रूपये रोख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय, पिंपरी ता. चांदूर बाजारचे विद्यार्थी भावेश गोपाल सोसे, नमन सोनारे, आदित्य तायडे यांना तृतीय बक्षीस व एक हजार रूपये रोख स्व. श्री. गणुजी बापुजी भोकरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रदान करण्यात आले.

सिनियर श्रेणीमध्ये मणिबाई गुजराती हायस्कुलचे विद्यार्थी ओम देशमुख, समर्थ विधाते, श्रावण कोंडे यांना प्रथम बक्षीस व ३ हजार रूपये रोख, शिवाजी मल्टीपर्पज उच्च माध्यमिक शाळेचे विद्यार्थी प्रेम च-हाटे द्वितीय व २ हजार रूपये रोख, गुरुकुल इंग्लिश मिडियम स्कुल, दिग्रसचे विद्यार्थी अर्जून दूधाने, अजय राठोड, अर्थव रुद्राक्षवर यांना तृतीय व एक हजार रूपये रोख स्व. श्री. अशोकराव हिरूळकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रदान करण्यात आले. तर प्रोत्साहनपर बक्षिस शाश्वत कन्सेप्ट स्कुलचे विद्यार्थी एकांश गवई, भव्य डेंबला यांना प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरुळकर, नरेश मोवाळे, रवी ढेंगळे, प्रशिक्षणार्थी भावेश वारके, प्रज्वल वानखडे, कोमल काळबांडे, मेघवाटिकाचे डॉ. केतकी कालेले, राहुल चूटे यांनी अथक परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांना पुरस्कृत करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व इतर मान्यवर

















# माझी संकल्पना- सर्वोत्कृष्ट संकल्पना या आत्मविश्वासाने स्पर्धेत सहभागी व्हा - कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते

## जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६: विभागीय पात्रता फेरी उत्साहात आणि यशस्वीरित्या संपन्न




जागतिक स्तरावर तरुणांच्या कौशल्यांना वाव देणाऱ्या आगामी 'जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६' साठी आयोजित करण्यात आलेली विभागीय पात्रता फेरी दि. २४ डिसेंबर २०२६ रोजी अत्यंत उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विभागातील अनेक गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यांचे प्रदर्शन केले. या स्पर्धेच्या माध्यमातून अमरावती विभागातील प्रतिभावान युवक-युवतींना आपली कौशल्ये जागतिक स्तरावर सिद्ध करण्याची आणि अमरावती विभागाचे नाव उंचावण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

डॉ. श्रीकांत जिचकार सभागृह, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे दि.२४ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत अमरावती विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम या पाच जिल्ह्यातील वय वर्ष १६ ते २४ या वयोगटातील ६३ प्रकारच्या परंपरागत आणि आधुनिक कौशल्य गटातील उमेदवारांनी सहभाग घेतला होता. या विभागीय कौशल्य स्पर्धेत ११४ उमेदवारांची स्कील टेस्ट घेण्यात आली. ही स्पर्धा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील वेगवेगळ्या केंद्रांवर तसेच डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण अमरावती, CADD Info, रेडीयंट हॉस्पीटल येथे आयोजित करण्यात आली होती.

या पात्रता फेरीचे उद्घाटन कुलगुरू डॉ . मिलिंद बाराहाते, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांनी केले



दीपप्रज्वलीत करून उद्घाटन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

तसेच या कार्यक्रमास प्र. कुलसचिव डॉ . नितीन कोळी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, उपायुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता ठाकरे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र , श्रीमती प्रांजली बारस्कर, संचालक निशांत शिंघल, हेल्थी रिफायनरी प्रायवेट लिमिटेड अमरावती, पुष्कर हाते, संचालक तसेच महाराष्ट्र राज्य प्रमुख,CII, उपसंचालक सुधा ठोंबरे, शासकीय ओद्योगिक प्रशिक्षण संस्था अमरावती, संचालक इनक्युबेशन सेंटर श्रीमती स्वाती शेरेकर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती हे उपस्थित होते. या उद्घाटनिय कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. अमोल मोहोड, कौशल्य विकास विभाग यांनी केले.

कार्यक्रम प्रसंगी उद्घाटकीय मार्गदर्शनामध्ये कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी सदर उपक्रमाची प्रशंसा करून यामुळे तळागाळातल्या कौशल्यांना व्यासपीठ प्राप्त झाल्याचे समाधान व्यक्त केले. या तसेच अमरावती विभागातील युवकांच्या कौशल्यांना जागतीक स्तरावर नेण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग प्रयत्नशील असून नक्कीच येथील तरूणाईमध्ये ती कौशल्ये असल्याचा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कौशल्य विकास विभागीय कार्यालय, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तसेच उखख चे पदाधिकारी तसेच इंक्युबेशन सेंटर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी मेहनत घेतली.







## बेघर बांधवांच्या मदतीसाठी विद्यापीठ सदैव तत्पर - कुलगुरू
## विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांची आधार केंद्राला सदिच्छा भेट




कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते विचार व्यक्त करतांना

मायबापांना बेघर करणे ही गंभीर समस्या असून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने कुलगुरू या नात्याने मला या बेघर बांधवांसाठी जी काही मदत करायची आहे, ती मी नक्कीच करेल. या बेघर बांधवांच्या मदतीसाठी विद्यापीठ सदैव तत्पर असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. बडनेरा स्थित आधार शहरी बेघर लोकांच्या निवारा केंद्राला कुलगुरूंनी सदिच्छा भेट दिली, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी भारतीय जैन समाज संघटनेचे अध्यक्ष श्री सुदर्शन गांग, प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गोविंद कासट, विदर्भ कुष्ठरोगी सेवा संस्था, तपोवनचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई, विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त असलेले डॉ. प्रफुल्ल गवई, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर, बार्टीच्या प्रकल्पाधिकारी अनिता गवई आदी मान्यवर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी आधार केंद्रातील व्यवस्थापन व स्वच्छतेबाबत आधार केंद्राच्या व्यवस्थापक कु. ज्योती राठोड आणि पब्लिक एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष तथा आधार केंद्राचे संचालक श्री राजे बसवनाथे यांचे कौतुक करुन त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्यात. तसेच आधार केंद्र बेघर बांधवांसाठी चांगले कार्य करीत असून त्यांच्या मदतीसाठी विद्यापीठ सदैव तत्पर असल्याचेही त्यांनी सांगितले.

भारतीय जैन समाज संघटनेचे अध्यक्ष श्री सुदर्शन गांग, प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गोविंद कासट, विदर्भ कुष्ठरोगी सेवा संस्था, तपोवनचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई, विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त असलेले डॉ. प्रफुल्ल गवई, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर, बार्टीच्या प्रकल्पाधिकारी अनिता गवई, ज्येष्ठ समाजसेवक जवाहर गांग यांनी सुद्धा या निराधार बेघर बांधवांसाठी मदतीचा हात देण्यास सदैव तत्पर असल्याचे मनोगतातून सांगितले.

सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करण्यात आले. अमरावती महानगरपालिकेच्या राष्ट्रीय उपजीविका अभियानांतर्गत पब्लिक एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटी द्वारा संचालित आधार शहरी बेघर लोकांसाठी निवारा केंद्राला सदिच्छा भेट दिल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्योति राठोड, सूत्रसंचालन राजू बसवनाथे यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. सुभाष गवई यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोहित घोंगडे, विलास थोरात, किशोर मरकाम व निवारावासीयांनी अथक परिश्रम घेतले.




याप्रसंगी उपस्थित बेघर बांधव

## विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन व मानवाधिकार दिन उत्साहात श्रमदान उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन व मानवाधिकार दिन विशेष उपक्रमाने साजरा करण्यात आला. सामाजिक दायित्व, पारदर्शकता आणि मानवी मूल्यांचा संदेश पोहोचविण्याच्या उद्देशाने विभागाच्यावतीने विद्यापीठ परिसरात विद्यार्थ्यांनी श्रमदान करुन सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय आणून दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. के.बी. नायक म्हणाले, भ्रष्टाचार देशाच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीला बाधा आणतो, त्यामुळे तरुणांनी प्रामाणिकपणा, नैतिकता, उत्तरदायित्वाची भावना बाळगून समाजनिर्मितीत सक्रिय भूमिका घेतली पाहिजे. मानवी अधिकार हे प्रत्येकाचे जन्मसिध्द हक्क आहेत, त्यांचे संरक्षण सर्वांच्याच उत्तरदायित्वाचा विषय आहे. यावेळी कायदे, संविधानातील तरतुदी आणि मानवाधिकारांच्या मूलभूत संकल्पना समजावून सांगत, समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी विद्यार्थीच प्रमुख शक्ती असल्याचे डॉ. नायक म्हणाले.

याप्रसंगी सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनी, संशोधक, अध्यापक यांनी परिसरात स्वच्छता, कचरा व्यवस्थापन जनजागृती, स्वच्छ परिसर अभियान, वृक्षतळ साफसफाई, श्रमदान असे विविध उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय आणून दिला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मानवाधिकार दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना मानवाधिकारांची व्याप्ती, संरक्षण करणा–या संस्था, संयुक्त राष्ट्रांच्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी सुध्दा भ्रष्टाचार विरोधी संकल्पना, मानवाधिकार संरक्षण, समाजातील नैतिक मूल्यांविषयी विशेष दखल घेतली. संचालन कु. एन.एन.काळे, तर आभार कु. साक्षी भगत हिने मानले. कार्यक्रमाला विभागातील प्राध्यापकवृंद डॉ. प्रशांत भगत, डॉ. रोहिणी देशमुख, डॉ. रोहिणी वावरे, प्रा.साधना इंगोले, प्रा. सुनिता इंगळे, श्री प्रवीण गडलिंगकर, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विद्यापीठाला राष्ट्रीय एकात्मता शिबीराकरीता महाराष्ट्र व गोवा राज्याचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान

## जयपूर येथे होणा-या राष्ट्रीय एकात्मता शिबीरात विद्यापीठाचे स्वयंसेवक सहभागी होणार



रोहन वानखडे | हिमांशू राठी | एकनाथ काळे | कृष्णा घर्डीनकर | कुणाल इंगळे



कु. प्रियंका म्हस्के | कु.विजया अस्वार | कु. वैभवी मोरगंजे | कु. वैष्णवी पानझडे | कु. संस्कृती खरडे

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व खेल मंत्रालयामार्फत दि. २५ ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीत एस.एस.जैन सुबोध पी.जी कॉलेज, रामबाग सर्कल, जयपूर, राजस्थान येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय राष्ट्रीय एकात्मता शिबीर होत आहे. राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृध्दींगत व्हावी, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि देशभक्तीचे संस्कार रुजविल्या जावे, या हेतुने सदर शिबीराचे आयोजन करण्यात आले असुन देशभरातील ११ राज्यांचे स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे या शिबीराकरिता महाराष्ट्र व गोवा राज्याचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान एकमेव संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला प्राप्त झाला आहे.

विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णूता, सामाजिक बांधिलकी यासाठी विविध उपक्रमांव्दारे विद्यार्थ्यांना संस्कारक्षम, तत्परता व सक्षम करण्यासाठी नियमितपणे समाजप्रबोधनाचे कार्य अविरतपणे करीत आहे. नियमीत उपक्रमाद्वारे महापुरुषांचे विचार हे जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमातून घेऊन श्रमदान, युवा सप्ताह, कार्यशाळा, शिबीर व सरकारच्या विविध कार्यक्रमांत स्वयंसेवक विद्यार्थी सहभागी होत असतात.

चमूंमध्ये प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेराचा रोहन वानखडे, जी, एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांवचा हिमांशू राठी, गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय, पुसदचा एकनाथ काळे, कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबचा कृष्णा घर्डीनकर, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावतीचा कुणाल इंगळे, श्री. वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणीची कु. प्रियंका म्हस्के, श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोटची कु. विजया अस्वार, श्री. शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखलीची कु. वैभवी मोरगंजे, श्री. रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय, वाशिमची कु. वैष्णवी पानझडे व तक्षशिला इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, दारापुरची कु. संस्कृती खरडे यांचा समावेश आहे.

कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू यांच्या मार्गदर्शनात श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या रासेयो महिला कार्यक्रम अधिकरी डॉ. हर्षाली वानखडे दहा विद्यार्थ्यांची चमू घेऊन चमू व्यवस्थापक म्हणून महाराष्ट्र व गोव्याचे प्रतिनिधित्व करण्याकरीता जयपूरला रवाना होणार आहे.

कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे भरभरुन कौतुक करुन ही बाब विद्यापीठाकरिता अभिमान व गौरवास्पद असून विद्यापीठाचे नाव उंचावणारी असल्याच्या सद्भावना याप्रसंगी व्यक्त केल्या. प्र–कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे. रासेयो चे संचालक डॉ. निलेश कडू यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या.

## विद्यापीठाचेवतीने ‘जीवनाचे प्रभावी व्यवस्थापन’ विषयावर कार्यशाळा संपन्न



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र आणि श्रीरामकृष्ण विवेकानंद समिती, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व नैतिक मूल्याची वाढ करण्याच्या दृष्टीने ‘जीवनाचे प्रभावी व्यवस्थापन’ या महत्वपूर्ण विषयावर नुकतीच एकदिवसीय युवा कार्यशाळा संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे, श्रीरामकृष्ण मिशन, वडोदरा, गुजरात येथील श्रीमत स्वामी अनंतरानंद, सिम्बॉसिस महाविद्यालय, पुणेचे सेवानिवृत्त विभागप्रमुख डॉ. शिरीष लिमये, स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. योगेश्वर कुरवाडे रामकृष्ण विवेकानंद समितीचे उपाध्यक्ष श्री प्रमोद देशमुख उपस्थित होते.

कार्यशाळेच्या प्रथम सत्रात श्रीरामकृष्ण मिशन, वडोदरा, गुजरात येथील श्रीमत स्वामी अनंतरानंद यांनी तुम्हीच तुमच्या भाग्याचे निर्माते आहात या विषयावर, तर दुस–या सत्रात सिम्बॉसिस महाविद्यालय, पुणेचे सेवानिवृत्त विभागप्रमुख डॉ. शिरीष लिमये यांनी सकारात्मक दृष्किोन या विषयाची मांडणी करतांना सकारात्मक दृष्किोन, आत्मशिस्त व समाजाप्रती असलेली जबाबदारी यावर विस्तृत मार्गदर्शन केले. संवादात्मक सत्र व मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मान्यवरांनी समर्पक उत्तरे देवून त्याचे महत्व पटवून दिले. शेवटच्या सत्रात कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदविल्याद्दल उपस्थित विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

कार्यशाळेत स्वामी विवेकानंद व रामकृष्ण परमहंस यांच्या जीवनदर्शनाच्या आदर्श विचारांचा विशेष संदर्भ देण्यात आला. कार्यशाळेची सुरुवात ओम सहनाववतु, सहनौ भुनक्तु या मंगल प्रार्थनेने करण्यात आली. प्रास्ताविकतेतून स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. योगेश्वर कुरवाडे व रामकृष्ण विवेकानंद समितीचे उपाध्यक्ष श्री प्रमोद देशमुख यांनी युवा कार्यशाळेमागील भूमिका विषद केली. संचालन श्री दुर्गेश शिवणकर, तर आभार प्रा. श्रीकांत रासेकर यांनी मानले. शांतीपाठाने कार्यशाळेचा समारोप झाला. कार्यशाळेला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



# ग्रामीण भारतापुढील आव्हाने समजून घेणे काळाची गरज - जयदीप हर्डीकर

## डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमाला संपन्न




व्याख्यान प्रसंगी विचार व्यक्त करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

ग्रामीण भारत आज अनेक गंभीर आव्हानांचा सामना करीत आहे. जागतिकीकरण, आर्थिक विषमता, हवामान बदल ही आजच्या काळातील प्रामुख आव्हाने आहेत. ग्रामीण भागातील समस्यांवर आज अभ्यास करणे गरजेचे असून ग्रामीण भागातील समस्या सोडविण्यासाठी केवळ शासनच नव्हे, तर नागरिकांनी ही जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे, असे आवाहनात्मक प्रतिपादन अभ्यासक व मुक्त पत्रकार श्री जयदीप हर्डीकर यांनी केले. 'ग्रामीण भारतातील सद्यस्थिती व आव्हाने' या विषयाची मांडणी करतांना ते बोलत होते. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था व नियमन केंद्र आणि श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानप्रसंगी व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. जयवंत पुसदेकर, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास कुलट व नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे उपस्थित होते.

विषयाची मांडणी करतांना श्री जयदीप हर्डीकर म्हणाले, आजच्या प्रसारमाध्यमांवरील वादविवाद बघितले तर आपल्या देशासमोर कुठल्याच समस्या नाहीत असे दिसते. ग्रामीण भागातील प्रश्नांना योग्य कव्हरेज मिळत नाही, जोपर्यंत आपण ग्रामीण भागाला समजून घेत नाही, तोपर्यंत आपल्याला देशाचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक वारसा उमजणार नाही. शेतक–यांसमोर अनेक समस्या आहेत. तो कर्जबाजारी कां झाला, आत्महत्या का करीत आहे हे प्रश्न शासनासह जनतेने सुध्दा समजून घेतले पाहिजे. अमरावती व यवतमाळ जिल्हे सर्वाधिक आत्महत्याग्रस्त जिल्हे म्हणून ओळखले जातात. त्यांनी कर्जबाजारी शेतक–यांच्या होणा–या दुरावस्थेचे उदाहरण देतांना चंद्रपूर जिल्हातील शेतक–याला कर्ज फेडण्याकरिता किडणी विकावी लागल्याची ह्रदयकारक घटना सांगितली.

सध्या शहराचा खुप लाड चालला आहे. मेट्रो, चकचकीत रस्ते, स्वस्त भाजीपाला, फाईव्ह – जी, सुविधा यांसारख्या आधुनिक सुविधा पुरविल्या जातात. मात्र दुसरीकडे ग्रामीण भागात आजही शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणी व वीज आदी मूलभूत सुविधांचा अभाव दिसून येतो. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील विकासाची दुरी अधिक वाढत आहे. शेतकरी जगतात कसे, नवीन युवकांना शेती का करावीशी वाटत नाही. त्यांच्यात शेतीविषयी अनास्था निर्माण होत असल्यामुळे तो भाग अस्थिर होत असल्याचे ते म्हणाले.




विषयाची मांडणी करतांना व्याख्याते श्री जयदीप हर्डीकर

भारतातील बहुतांश शेती पावसावर अवलंबून आहे. पण निसर्गाचे झालेले असंतुलन, हवामान बदल यामुळे देशात कधी दुष्काळ, तर कधी मोठ्या प्रमाणावर पाऊस यामुळे पिकांचे आणि शेतीचे अतोनात नुकसान होत आहे. या वर्षी पंजाब आणि महाराष्ट्रामध्ये शेती व पिके वाहून गेली. अऩेक अडचणींचा सामना शेतक–यांना करावा लागला. अनेक संकटे शेतक–यांवर कोसळली. शेतमालाला कमी भाव त्यामुळे शेतकरी अजून खचून गेला.

ग्रामीण भागातील जनता शहरी भागातील जीवनशैलीचे अनुकरण करतांना त्यांच्या महत्वाकांक्षा सुध्दा बदलतात. एकीकडे जगाचा आर्थिक खेळ चालला आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण भागाचा विकास मागे पडतांना दिसून येतो. भारत हा कृषीप्रधान देश असून शेतीतील उत्पन्नापेक्षा बिगर शेतीतील उत्पन्न अधिक असल्याचे दिसून येते. काही मोजक्याच लोकांकडे देशातील संपत्ती एकवटतांना दिसते. हे चित्र अर्बन व रुरल इंडियामध्ये मोठी विषमता निर्माण करित आहे. यावर उपाय म्हणून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे पालकत्व शिक्षण क्षेत्राने स्वीकारले पाहिजे आणि नागरिकांनीही ग्रामीण भागातील सद्यस्थिती सुधारण्यासाठी आणि तेथील आव्हाने दूर करण्यासाठी जबाबदारी घ्यावी, असेही ते म्हणाले.

**शेतकरी आत्महत्यांवर विद्यापीठ उपाययोजना सुचविणार – कुलगुरू**

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते बोलतांना म्हणाले, यवतमाळ व अमरावती सर्वात जास्त आत्महत्याग्रस्त जिल्हे म्हणून ओळखले जातात. शेतक–यांच्या उन्नतीसाठी शासनाने अनेक योजना राबविल्यात, पण आत्महत्या कमी होतांना दिसत नाहीत. आत्महत्यांसाठी ग्राऊंड स्तरावर असलेल्या मुद्यांवर विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था व नियमन केंद्राच्यावतीने तज्ज्ञांच्या समितीचे संशोधन सुरू आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर विद्यापीठ ठोस उपाययोजना सूचविणार, त्यामुळे शेतक–यांच्या आत्महत्या कमी होतील, असा विश्वास कुलगुरूंनी याप्रसंगी व्यक्त केला. अध्यक्षीय भाषण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. जयवंत पुसदेकर यांनी केले.

सुरुवातीला डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शाल, श्रीफळ व ग्रंथ भेट देवून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व वक्त्यांचा परिचय नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, स्वागतपर भाषण प्राचार्य अंबादास कुलट, संचालन डॉ. प्रवीण हरमकर, तर आभार डॉ. सुवर्णा गाडगे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी, संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी व विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# विद्यापीठातील इनोव्हेशन इन्क्युबेशन ॲन्ड लिंकेजेस आयोजित 'बिझिनेस प्लॅन स्पर्धा' ला नवउद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## विद्यार्थ्यांनो, नोकरी घेण्यापेक्षा देणारे व्हा-डॉ. अजय लाड



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. अजय लाड

उदयोन्मुख तरुणांनी नोकरी घेणा-यापेक्षा देणारे व्हा, असे आवाहन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळव्दारा आयोजित 'बिझिनेस प्लॅन स्पर्धा'-२०२५' कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख्य अतिथी म्हणून अमरावती एमआयडीसी असोसिएशनचे सचिव श्री आशिष सावजी, इनक्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरूळकर उपस्थित होते.

डॉ. अजय लाड म्हणाले, प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या महाविद्यालयात छोट्या स्वरूपात ॲक्टिव्हिटी बेस बिझनेस प्लॅन राबवावे. तसेच विद्यार्थ्यांना छोट्या स्वरूपात भांडवल उपलब्ध करून द्यावे. कुठल्याही व्यवसायाची सुरुवात ही छोट्याशा प्रयत्नापासून होत असते, असेही ते म्हणाले.

श्री आशिष सावजी म्हणाले, बिझिनेस प्लॅन हा कागदावरून प्रत्यक्षात साकारण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावे. नवीन व्यवसाय सुरु करतांना प्रत्येकांनी संधीशोधक असले पाहिजे. जिथे आपल्याला संधी मिळते, त्या संधीचे सोने करण्याचा प्रयत्न करावा, असे ते म्हणाले.

विद्यापीठात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान पी.एम. उषा अंतर्गत बोर्ड ऑफ इनोव्हेशन इन्क्युबेशन ॲन्ड लिंकेजेस आणि रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने या एकदिवसीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना मूर्त रूप देण्याकरिता व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. उद्योजकता, नवोपक्रम आणि व्यवसाय नियोजनाची कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावी हा यामागील उद्देश होता. तंत्रज्ञान, कृषी, आरोग्यसेवा आणि शाश्वत विकास या प्रकारात नवउद्योजकांनी व्यवसाय कल्पना, उद्दिष्टे, धोरणे, व्यवसाय मॉडयुल तसेच आर्थिक अंदाज यानुसार आपल्या बिझनेस प्लॅन चे सादरकीरण यावेळी केले. नवउद्योजकांनी सादर केलेल्या योजनांचे तज्ज्ञ परीक्षक मंडळाने मूल्यांकन केले. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक श्री आनंद यादव, सूत्रसंचालन श्री अमोल हिरुळकर यांनी केले. कार्यक्रमाला पाचही जिल्ह्यांमधील विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.



कार्यशाळेला उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थीनी

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्यपूर्तीचा संकल्प करावा - कुलसचिव डॉ. अविनाश असनारे

## विद्यापीठात महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न




विचार व्यक्त करतांना कुलसचिव डॉ. अविनाश असनारे

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वोत्कृष्ट संविधान या देशाला प्रदान करुन खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता लोकशाहीच्या माध्यमातून नागरिकांना दिली. त्यांचे भारतीयांवर फार मोठे उपकार असून त्यांनी केलेले कार्य आणि दिलेले विचार पूर्ण करण्यासाठी प्रत्येकाने त्यांचा महापरिनिर्वाण दिन संकल्प दिन म्हणून साजरा करावा, असे मत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी व्यक्त केले. डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्रामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित केला होता, त्याप्रसंगी अध्यक्षस्थावरुन ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. अविनाश असनारे पुढे म्हणाले, विद्यापीठात संदेशशिल्पाची निर्मिती करुन बाबासाहेबांचे विचार पोहोचविण्याचा विद्यापीठ सातत्याने प्रयत्न करीत आहे. याशिवाय त्यांच्या विचारावर संशोधन व अभ्यास व्हावा, यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग सुरु करण्यात आला आहे. डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने विविध कार्यक्रम, उपक्रम व व्याख्यानांचे आयोजन करुन बाबासाहेबांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत विद्यापीठाच्या माध्यमातून पोहोचविले जात आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी म्हणाले, बाबासाहेबांमुळेच या देशामध्ये दलित, वंचित व शोषितांना समान संधी मिळाली. सामाजिक विकासाचे श्रेय खऱ्या अर्थाने बाबासाहेबांना जाते. बाबासाहेब आमच्या मनात सदैव असून बाबासाहेबांचे विचार पुढे नेण्याकरीता सर्वांनी प्रयत्न करावा व त्यांचे राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी पुढे यावे, असेही त्यांनी सांगितले.

मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे म्हणाल्या, बाबासाहेबांनी अन्याय, अत्याचारावर प्रखर टीका करुन अन्यायाविरुध्द लढा दिला. स्वातंत्र्यानंतर उपेक्षित समाजाला बाबासाहेबांनी सामाजिक न्याय देण्याचा प्रयत्न केला. घटनेच्या माध्यमातून स्त्रियांना अधिकार दिले. त्यांच्यामुळेच आज उपेक्षित समाज आणि महिलांची खरी प्रगती होतांना दिसत आहे, हे पाहून आनंद वाटत असल्याचेही त्या म्हणाल्या.

प्रास्ताविकतेतून डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड यांनी अभिवादन कार्यक्रमामागील भूमिका मांडली. संचालन व आभार डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे यांनी मानले. अभिवादन कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



डॉ. नितीन कोळी विचार व्यक्त करतांना




डॉ. मोना चिमोटे मनोगत व्यक्त करतांना



# विद्यापीठात कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांचा पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न



कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्ताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गाडगे बाबा अध्यासन केंद्रात पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी प्रभारी कुलसचिव तथा परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. तसेच मुख्य प्रवेशद्वारा समोरील श्री संत गाडगे बाबांच्या संदेशशिल्पाला पुष्पार्पण करुन अभिवादन करण्यात आले.

पुण्यतिथी कार्यक्रमाला माजी प्र–कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, संगणक केंद्र प्रमुख डॉ. सुहास पाचपांडे, श्री संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. दिलीप काळे, महानुभाव अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. महंत सोनपेठकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधाराचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे, प्रा.डॉ. संयोगिता देशमुख, प्रा.डॉ. प्रणव कोलते, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, डॉ. सुलभा पाटील, सौ. मोनाली तोटे पाटील, सौ. मिनल मालधुरे, डॉ. साक्षी ठाकूर, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्याबद्दल माहिती श्री संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. दिलीप काळे यांनी केले.



कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या संदेश शिल्प ला अभिवादन करतांना विद्यापीठातील विभागप्रमुख, अधिकारी,शिक्षक व कर्मचारी

# सौ. स्वप्ना यावले लिखित 'वेदांचा सामान्य परिचय' पुस्तकाचे विमोचन



पुस्तकाचे विमांचन करतांना मान्यवर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संस्कृत विभागात नुकत्याच पार पडलेल्या संस्कृत भारतीच्या संगोष्ठीमध्ये सौ. स्वप्ना प्रशांत यावले लिखित 'वेदांचा सामान्य परिचय' या प्रथम पुस्तकाचे संस्कृत भारतीचे अखिल भारतीय प्रचारप्रमुख श्री श्रीश देवपुजारी, विदर्भ प्रांताचे प्रांत प्रचारप्रमुख श्री देवदत्त कुळकर्णी यांचे हस्ते विमोचन करण्यात आले. याप्रसंगी संस्कृत विभागाच्या समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख, ॲड. प्रशांत यावले, डॉ. राहुल लोधा, प्रा. श्वेता बडगुजर, प्रा. प्रियंका मोहोड, प्रा. आकाश हरणे, प्रा. मोरेश्वर वेखंडे आदी उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी संस्कृत भाषेतील निरनिराळ्या पैलूंवर झालेल्या चर्चेदरम्यान श्री. श्रीश देवपुजारी यांनी संस्कृत भाषेची गहनता विषद केली. पुस्तकासाठी ऋतुराज यावले यांचे तांत्रिक सहाय्य लाभले, त्याबद्दल प्रा. स्वप्ना यावले यांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली व उपस्थितांचे आभार मानले. शांतीमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

## विद्यापीठातील संस्कृत विभागाचे दोन विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत



अमृता कोरडे



डॉ. राजीव मुलमुले

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संस्कृत विभागाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम व द्वितीय येण्याचा मान पटकावून विद्यापीठाचे तसेच संस्कृत विभागाचे नाव उंचावले. अमृता कोरडे प्रथम, तर डॉ.राजीव मुलमुले यांनी व्दितीय स्थान प्राप्त केले.

'असाध्य ते साध्य करीसी कारण सायास तुका म्हणे' या ओवी प्रमाणे दोन्ही विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी व प्रचंड मेहनत करून दाखवून दिले आहे. विद्यार्थ्यांनी मिळिवलेल्या या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विभागाच्या समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख, प्रा. डॉ. राहुल लोधा, प्रा. स्वप्ना यावले, प्रा. श्वेता बडगुजर, प्रा.प्रियंका गावंडे, प्रा. आकाश हरणे, तसेच शिक्षकेतर कर्मचा-यांनी अभिनंदन केले.

आईवडिलांचे आशीर्वाद, शिक्षकांनी दिलेले अध्ययनाचे धडे व विद्यापीठातील समृध्द ग्रंथालय यामुळे हे यश प्राप्त करू शकलो, असे याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# कर्मचारी कुटुंबाप्रमाणे विद्यापीठ कार्यासाठी स्वत:ला वाहून घेतात - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचा-यांना समारंभपूर्वक निरोप



मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

विद्यापीठातील कर्मचारी आपल्या कुटुंबाप्रमाणे स्वत:ला विद्यापीठ कार्यासाठी वाहून घेत निष्ठा व प्रामाणिकपणे काम करतात, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा–यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, सहा. कुलसचिव श्री रविंद्र सयाम, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम, सौ. घोम, श्री मोहन डाबरे, सौ. डाबरे, श्री प्रफुल्ल ठाकरे, सौ. ठाकरे उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले, विद्यापीठ हे एक कुटुंब आहे व कर्मचारी निष्ठेने आपली कामे प्रामाणिकपणे करतात. विद्यापीठाचा जो निसर्गरम्य परिसर झाला आहे, त्याचे श्रेय विद्यापीठाच्या उद्यान विभागाचे आहे. वृक्षारोपण, संवर्धन हे मोठे कार्य असून यासाठी उद्यान विभागाने मोठे परिश्रम घेतले आहे. कर्मचा–यांचा कामाचा असलेला उत्साह, निष्ठा ही मोठी जमेची बाजू असून, उद्यान विभागाचे अधीक्षक श्री अनिल घोम यांना उद्यानश्री असे संबोधले तर ते वावगे होणार नाही, असेही कुलगुरू म्हणाले व तीनही सत्कारमूर्तींना उज्ज्वल भविष्याच्या शुभकामना दिल्या. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी श्री अनिल घोम, श्री मोहन डाबरे, श्री प्रफुल्ल ठाकरे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. तर सौ. घोम, सौ. डाबरे व सौ. ठाकरे यांचा सौ. प्रज्ञा बोंडे यांनी साडी–चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला.

प्रमुख अतिथी डॉ. भैय्यासाहेब मेटकर म्हणाले, विद्यापीठाचे कर्मचारी अतिशय नम्रपणे व प्रामाणिकपणे कामे करतात. कर्मचा–यांची उणीव भासत असली तरीही त्याचा बाऊ न करता कर्मचा–यांचे सातत्याने आपल्या संस्थेप्रती असलेले प्रेम, निष्ठा, प्रामाणिकपणा आजही कायम आहे, असे सांगून त्यांनी सर्व सत्कारमूर्तींना पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्या.



व्य.प.सदस्य डॉ. व्हि.एम.मेटकर अतिथीपर विचार व्यक्त करतांना

यावेळी सत्कारमूर्ती श्री अनिल घोम, श्री मोहन डाबरे, श्री प्रफुल्ल ठाकरे यांनी आपल्या सेवा काळातील अनुभव सांगतांना सहकारी कर्मचा–यांकडून मिळालेल्या प्रेम, स्नेहभावाबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच सीए. पुष्कर देशपांडे, श्री रविंद्र सयाम, श्री शशिकांत रोडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे श्री अजय देशमुख यांनीही मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्ज्वल भविष्याच्या व दिर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्यात.

विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे, उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, कोषाध्यक्ष श्री राजेश एडले यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश व पुस्तक देऊन सत्कार केला. याप्रसंगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील प्रा. प्रफुल्ल खराटे यांनी श्री मोहन डाबरे यांचा सपत्नीक सत्कार केला. विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई यांनी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांना वृक्षरोपटे भेट दिले. विद्यापीठाचा परिसर आणखी हिरवागार व्हावा, म्हणून वृक्षारोपणासाठी डॉ. गवई यांनी ५२४ वृक्ष भेट दिले. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन भांडार विभागाचे अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी, तर आभार श्री संजय ढाकुलकर यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.



श्री प्रफुल्ल ठाकरे यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



श्री मोहन डाबरे यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



श्री अनिल घोम यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



डॉ. प्रफुल्ल गवई यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



# विद्यार्थ्यांनी मूल्यांची जपवणूक व कर्तव्यांची जाणीव ठेवावी - डॉ. मनिषा कोडापे

## विद्यापीठात वीर बाल दिवसाचे आयोजन



मार्गदर्शन करतांना व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे

इतिहास हा भावी पिढीला दिशादर्शक असतो. इतिहासातून आपण काय घेतले पाहिजे, हे महत्वाचे असून विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्याकरीता मूल्यांची जपवणूक आणि आपल्या कर्तव्यांची जाणीव या गोष्टींना आपल्या जीवनात सर्वोच्च महत्व दिले पाहिजे. पालकांनी आपले पाल्य संस्कारक्षम कसे होतील, या उद्देशाने त्यांना शिक्षित करावे, असे प्रतिपादन विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे यांनी व्यक्त केले. शीख धर्माचे दहावे गुरू गोविंद यांचे सुपूत्र साहिबजादा बाबा जोरावर सिंहजी आणि साहिबजादा बाबा फतेह सिंहजी यांच्या सर्वोच्च बलिदानाच्या स्मृतिप्रित्यर्थ देशभर वीर बाल दिवस संपन्न होतो. त्यानिमित्ताने विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग आणि ज्ञानरुोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वीर बाल दिवस कार्यक्रमप्रसंगी मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी ज्ञानरुोत केंद्राच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील व विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

डॉ. मनिषा कोडापे पुढे म्हणाल्या, आजच्या पिढीला सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत. पालकसुद्धा आपल्या मुलांची अधिक जास्त काळजी घेतात, असे असले तरी, मुलांनी सोशल मिडीयाचा योग्य मूल्यांसाठी वापर करावा. त्यांनी चांगले ज्ञान संपादित करुन आपले करिअर घडवावे व देशाच्या विकासासाठी सदैव तयार रहावे, असे त्यांनी सांगितले.

डॉ. श्रीकांत पाटील म्हणाले, औरंगजेबने केलेल्या अन्यायाला शीख समुदयाने समर्थपणे तोंड दिले. शीख समुदायाने मोठा इतिहास घडविला असून आजच्या विद्यार्थ्यांनी वीर बालकांपासून प्रेरणा घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. वैशाली गुडधे म्हणाल्या, २२ डिसेंबर, २०२२ पासून वीर बाल दिवस हा कार्यक्रम सुरु झाला आहे. साहिबजादा बाबा जोरावर सिंहजी आणि साहिबजादा बाबा फतेह सिंहजी हे मृत्युमुखी पडले, त्यांची देशभक्ती त्यातून दिसून येते. पालकांसाठी सुद्धा ही घटना महत्वाची असून आपल्या मुलांना कशाप्रकारे संस्कार व मूल्ये द्यावीत, याचा बोध या घटनेतून मिळतो. यावेळी छत्रपती संभाजी महाराज आणि कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

सुरुवातीला कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी साहिबजादा बाबा जोरावर सिंहजी आणि साहिबजादा बाबा फतेह सिंहजी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी, तर आभार श्री विशाल बापते यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठात
# श्री संत संताजी जगनाडे महाराज जयंती साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महाराष्ट्राच्या संत परंपरेतील थोर संत श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व श्री संत संताजी जगनाडे महाराज यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

# विद्यापीठात माजी पंतप्रधान भारतरत्न
# श्री अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती सुशासन दिन म्हणून साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात माजी पंतप्रधान भारतरत्न श्री अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती सुशासन दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व श्री अटल बिहारी वाजपेयी यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

## विद्यापीठात शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची जयंती साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था व नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, डॉ. भगवान फाळके, उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम, मुंबई विद्यापीठातील भाषा अभ्यासक व संशोधक डॉ. दिपक पवार तसेच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्याबद्दल माहिती केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे यांनी दिली.

## विद्यापीठात पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन जयंती साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात स्वातंत्र्य संग्राम सेनानी, ज्येष्ठ कुष्ठसेवक पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क विभागातील श्री सुनिल महल्ले यांनी दिली.



## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बास्केटबॉल (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ फिजिकल एज्युकेशन, ग्वालियर येथे २३ ते २७ डिसेंबर, २०२५ दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बास्केटबॉल (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये ब्राजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीची कु. गौरी भोंडे, कु. आश्लेष रावळे व कु. खुशी तायडे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची कु. सोनाली महातो, कु. प्रेरणा शानिती, कु. रुपमित लिचा व कु. मोनिका मसुंदर, जी.एस. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारची कु. वेदांती ठाकरे, कु. यामिनी घरत, कु. नेहा पुनवटकर व कु. श्रावणी वडतकर, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावतीची कु. नंदिनी रावळे, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीची कु. दिक्षा दोडके, कु. गौरी मोहोड, प्रो. राम मेघे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, बडनेराची कु. राजनंदिनी बोदडे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीची कु. अक्षया उंबरीकर हिचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे दि. ११ ते २० डिसेंबर दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.



## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बॅडमिंटन (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

सिम्बीयॉसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठ, पुणे येथे २६ ते ३० डिसेंबर, २०२५ दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बॅडमिंटन (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये श्रीमती आर.डी.जी. महिला महाविद्यालय, अकोलाची कु. पारुल देशपांडे व कु. स्नेहा शाह, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीची कु. स्पुर्ती पेरसपुरे, एच.व्ही.एस.के.सी.पी.ई. यवतमाळची कु. मिलन रानी, एल.बी. अणे महिला महाविद्यालय, यवतमाळची कु. पुदरानी कुंटे व विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीची कु. केतकी भोजणे हिचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे दि. १४ ते २३ डिसेंबर दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.



## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ फुटबॉल (पुरुष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

पारूल युनिर्व्हसिटी, वडोदरा (गुजरात) येथे ०५ ते ११ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा–या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ फुटबॉल (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हाचा ऋतिक अतकर, प्रज्योत तायडे व ओम काशिकर, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा राज मिश्रा, दुकीवाकोरही, ओमहांग सुब्बा, झाकीएसटुओ केट्स, राहुल कुमार, पालडेन धोंडुप, अफर्मिंग तलंग व सोनम तमंग, दयाभाई पटेल शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळचा मोर्विन मोसेस, जी.एस. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारचा साहिल बेनिवाले, सुफियान अब्दुल व फैझल शेख, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा ओम धारव, मुस्तफा शेख, इंदिरा गांधी महाविद्यालय, राळेगांवचा अभिषेक बुटके व यश यादव, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचा रोमान खान, रियाज चौधरी व तुषार लोखंडे, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा रफिक खान, जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळचा कैवल्य राठोड आणि श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा निखिल गोंडे याचा समावेश आहे.

निवड झालेल्या संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे दि. २४ डिसेंबर, २०२५ ते ०२ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.



## अ.भा. आंतर विद्यापीठ योगा (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

स्वामी विवेकानंद योगा अनुसंधान संस्थान, बंगलोर येथे ०५ ते ०९ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा–या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगा (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची कु. जागृती पटले, कु. आयुषी पांडे, कु. प्रांजली जगताप व कु. दिपाली राऊत, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीची कु. समिक्षा कडू, नेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंतची कु. प्रतिक्षा तुपट, जे.डी. पाटील महाविद्यालय, दर्यापूरची कु. श्रावणी चव्हाण, जी.एस. गावंडे महाविद्यालय, उमरखेडची कु. तेजस्विनी बहाळे व एस.एस.जी.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेगांवची कु. प्राची वैराळे हिचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे दि. २४ डिसेंबर, २०२५ ते ०२ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.



# पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ हँडबॉल (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

युनिर्व्हसिटी ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, जयपूर येथे ०८ ते १२ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा–या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ हँडबॉल (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये आदर्श महाविद्यालय, धामणगांव रेल्वेचा वेदांत व–हाडे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा मधुर जोगळेकर, श्रेयस कांबळे, राजकुमार कासदेकर, कार्तिक मरसकोल्हे व कैलाश ठाकरे, स्व. दादाराव अडसड शारीरिक शिक्षण महाविद्यालय, धामणगांव रेल्वेचा वेदांत पंचबुध्दे, सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडाचा सुभान मुन्नीवाले, अभिषेक काळे व मंगेश इंगळे, इंदिरा महाविद्यालय, कळंबचा आदित्य सिरसाट व रवि भुशनवार, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा बंटी साहु, अनिकेत जाधव, जीवन पवार व तेजस हरमकर, एस.एस.जी.एम.सी.ई. शेगांवचा देवांग भोंडे, सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीचा अमेय पोटे, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा दर्शन सलामे आणि श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा रामक्रिष्ण धिकार याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती येथे दि. २७ डिसेंबर, २०२५ ते ०५ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.



# पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बॅडमिंटन (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

आय.टी.एम. युनिर्व्हसिटी, ग्वालियर येथे ०६ ते ११ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा–या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बॅडमिंटन (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा सौम्यादीप सहा, जी.एस. महाविद्यालय, खामगांवचा अर्नव निंबाळकर, सार्थक काटकर, रुद्र कचरे व पवन वानरे, इंदिरा महाविद्यालय, कळंबचा मयूर वाळगुंजे, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा पार्थ गाला व एस.एस.जी.एम.सी.ई. शेगांवचा रुद्रेश लटारे याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे दि. २५ डिसेंबर, २०२५ ते ०३ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.



## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ हॉकी (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

एल.एन.सी.टी. युनिर्व्हसिटी, भोपाळ येथे १२ ते १७ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा–या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ हॉकी (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा काझी बिलालुद्दीन, अम्मर यासीर, मोहम्मद हाशीर, मोहम्मद अकिब व सयीद मलिक, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा विकास परमार, दयाल मल्लिक, प्रणव शर्मा व ज्ञानेंद्र प्रताप, राजश्री शाहु विज्ञान महाविद्यालय, चांदुररेल्वेचा झहिद खान, माझ जिशान व सयीद झैनुलाबेदीन, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचा मोहम्मद शोएब, मोहम्मद अनस शाह, मोहम्मद उजैर, शेख अर्शद, फरान अहेमद, मोहम्मद उजैफ, समीर खान व अरबाज खान, गुलाम नबी आझाद महाविद्यालय, बार्शिटाकळीचा रोहीद दंडाळे, श्रीमती नानकीबाई वाधवाणी महाविद्यालय, यवतमाळचा विकी गिरी, कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबचा प्रथमेश ठोकळ याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे दि. ३१ डिसेंबर, २०२५ ते ०९ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.



## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ लॉन टेनिस (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

संजय घोडावत युनिर्व्हसिटी, कोल्हापूर येथे ०६ ते ११ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा–या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ लॉन टेनिस (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा प्रोमित बोरडोलोई व बिस्वज्योती बर्मन, बी.आर. आर्टसब एन.बी. कॉमर्स ॲन्ड बी.पी. सायन्स कॉलेज, दिग्रसचा विवेक मस्के, पी.आर. पोटे (पाटील) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावतीचा अपुर्व डहाके, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा अंशुल खंडतकर, सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीचा अमेय पोटे व भारतीय महाविद्यालय, अमरावतीचा सोमेश विटाळकर याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग ॲडव्हान्स टेनिक ॲकेडमी, बापु कॉलनी, दीपनगर, अमरावती येथे दि. २६ डिसेंबर, २०२५ ते ०४ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

# दक्षिण पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग (पुरूष व महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

सागे युनिर्व्हसिटी, भोपाळ येथे १३ ते १५ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा–या दक्षिण पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ वेटलिफ्टग (पुरूष) व १० ते ११ जानेवारी दरम्यान वेटलिफ्टग (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

**पुरुष संघ (वेटलिफ्टिंग )**

चमूंमध्ये कला व विज्ञान महाविद्यालय, कु–हाचा अनुराग मौर्य व कार्तिक मिश्रा, जनता कला वाणिज्य महाविद्यालय, मलकापूरचा गौरव कुरवाडे, आदित्य भालशंकर व सचिन राणे, विनायक विद्यामंदिर महाविद्यालय, अमरावतीचा सुमित देवतळे, स्व. कु. अर्चनाताई चव्हाण महाविद्यालय, कोंडाळाचा कार्तिक ढेंगळे, श्री विठ्ठल रुख्मिनी महाविद्यालय, सावनाचा फैजान खान याचा समावेश आहे.

महिला संघ (वेटलिथ्फ्टग

चमूंमध्ये नारायणराव राणा महाविद्यालय, बडनेराची कु. श्रेया वलिवकर, जनता कला वाणिज्य महाविद्यालय, मलकापूरची कु. पुजा कल्याणकर, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची कु. वैष्णवी पांडे, कला व वाणिज्य महाविद्यालय, येवदाची कु. अंजली इंगोले, इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावतीची कु. नेहा कलोसिया, श्री विठ्ठल रुख्मिनी महाविद्यालय, सावनाची कु. साक्षी बुरकुले व कला व वाणिज्य महाविद्यालय, कु–हाची कु. वंशिका बोडोले हिचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. पुरुष चमूंचा प्रशिक्षण वर्ग सिताबाई कला व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे दि. ३१ डिसेंबर, २०२५ ते ०९ जानेवारी २०२६ दरम्यान पुरुष व महिला चमूंचा प्रशिक्षण वर्ग दि. ०१ ते ०७ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

# अ.भा. आंतर विद्यापीठ ॲथलेटिक्स (पुरूष व महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

राजीव गांधी युनिर्व्हसिटी ऑफ हेल्थ सायन्स, कर्नाटक येथे १२ ते १६ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा–या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ॲथलेटिक्स (पुरूष व महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

**पुरुष संघ (ॲथलेटिक्स)**

चमूंमध्ये बॅरि. आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेराचा वैभव गवळी, स्वराज भोपाळे, नितीन हिवराळे, पार्थ सावरकर, आदिराज पाटील, रितेश लोणे, संकेत वायाळ, विकास वाघ व कुणाल चौधरी, कला व वाणिज्य महाविद्यालय, जरूडचा राहुल गवई, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा रिचर्ड ब्रॉन, हर्ष मोहन व रौनक दुबे, दयाभाई पटेल शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळचा सोहम झाटे, जे.बी. आर्टसब महाविद्यालय, चन्नी पातुरचा कृष्णकांत राखोंडे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा रेवण क्षीरसागर, एस.सी.पी.ई., अमरावतीचा मुन्सिफ शेख, श्री शिवाजी महाविद्यालय, चिखलीचा वैभव बरडे याचा समावेश आहे.

**महिला संघ (ॲथलेटिक्स)**

चमूंमध्ये मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणाची कु. पुनम बंगाळे, बी.एस. पटेल महाविद्यालय, पिंपळगांव काळेची कु. नेहा जाधव व कु. दिव्या जाधव, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची कु. प्रियांका कुंडू, बॅरि. आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेराची कु. वैष्णवी लवाळे, श्रीमती एस.आर. मोहता महिला महाविद्यालय, खामगांवची कु. प्रणाली शेगोकार आणि गुलाम नबी आझाद महाविद्यालय, बार्शीटाकळीची कु. नंदिनी गायकवाड हिचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. पुरुष व महिला चमूंचा प्रशिक्षण वर्ग डी.सी.पी.ई., अमरावती येथे दि. ३१ डिसेंबर, २०२५ ते ०९ जानेवारी २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

**दैनिक भास्कर**

# भावुक होना संस्थान के प्रति असीम प्रेम का प्रतीक

■ विद्यापीठ कर्मचारियों की सेवानिवृत्ति पर कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते का कथन



भास्कर डेस्क। अमरावती. विश्व विद्यालय से सेवानिवृत्त होते समय कर्मचारियों की आंखें नम हो जाती हैं और यही उनकी संस्था के प्रति मौजूद असीम प्रेम को दर्शाता है, ऐसे उद्गार कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते ने व्यक्त किए। संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के कर्मचारियों के सेवानिवृत्ति अवसर पर आयोजित कर्तव्यपूर्ति समारोह में वह अध्यक्षस्थल से बोल रहे थे।

व्यासपीठ पर प्रमुख अतिथि के रूप में प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, विश्वविद्यालय प्रबंधन परिषद की सदस्य डॉ. विद्या शर्मा, प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोली, नियंत्रण अधिकारी तथा रासायनिक प्रौद्योगिकी विभाग प्रमुख डॉ. ए.बी. नाइक, शैक्षणिक विभाग के प्रशासनिक केंद्र के प्रशासनिक अधिकारी डॉ. एन.वी. फिरके, आचार्य कक्ष की उपकुलसचिव मीनल मालधुरे, विश्वविद्यालय कर्मचारी संघ के अध्यक्ष अजय देशमुख, सम्मानित अतिथि डॉ. प्रशांत शिंगवेकर, शिंगवेकर, जी.के. जनवार, जनवार, के.बी. पाटील, पाटील, श्री डब्ल्यू.एन. चोपड़े, सौ. चोपड़े तथा जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर थे। डॉ. बारहाते ने डॉ. ...गवेकर, जी.के. जनवार, ...पाटील और डब्ल्यू. ...ड़े को शॉल, श्रीफल, ... और गौरव प्रमाणपत्र ...मानित किया। डॉ. विद्या ...हा कि सेवानिवृत्ति जीवन ...हत्वपूर्ण क्षण होता है और ... की भावनाएँ उनकी सेवा से गहराई से जुड़ी होती हैं।

विश्वविद्यालय कर्मचारी पतसंस्था की ओर से अध्यक्ष मंगेश वरखेडे, राजेश एडले और प्रवीण पडोले ने सम्मानित कर्मियों को भागभांडवल का धनादेश देकर सत्कार किया। प्रास्ताविक प्रभारी कुलसचिव डॉ. नितिन कोली, संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, आभार प्रदर्शन भंडार विभाग के अधीक्षक डॉ. धनंजय पाटील ने किया। मौके पर विभिन्न विभागों के प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तथा सम्मानित अतिथियों के परिवारजन उपस्थित थे।

**नवराष्ट्र**

**निरोप** \ कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे प्रतिपादन; कर्मचाऱ्यांचा सत्कार

# कर्मचाऱ्यांचे संस्थेप्रती निःस्सीम प्रेम

**सामाजिक**



▶ अमरावती, ब्युरो. विद्यापीठातून सेवानिवृत्त होत असताना कर्मचाऱ्यांचे डोळे पाणावतात आणि हेच कर्मचाऱ्यांचे आपल्या संस्थेप्रती असलेले निःस्सीम प्रेम दर्शविते, असे उद्गार कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विद्या शर्मा, प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी, नियंत्रण अधिकारी रासायनिक तंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. ए. बी. नाईक, शैक्षणिक विभागाच्या प्रशासकीय केंद्राचे प्रशासकीय अधिकारी डॉ. एन. व्ही. फिरके, आचार्य कक्षाच्या उपकुलसचिव मिनल मालधुरे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, सत्कारमूर्ती डॉ. प्रशांत शिंग्वेकर, शिंग्वेकर, जी. के. जनवार, जनवार, के. बी. पाटील, पाटील, डब्ल्यू. एन. चोपडे, चोपडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते. कुलगुरू म्हणाले, कर्मचारी आपल्या कुटुंबाप्रमाणे काम करतात, त्यामुळे कुटुंबातून ते सेवानिवृत्त होत आहेत, असे वाटते. सेवा काळात सहकारी कर्मचाऱ्यांकडून मिळालेले प्रेम, सहकार्यामुळे सेवानिवृत्तीच्यावेळी कर्मचारी भारावून जातात. विद्यापीठाचा प्रत्येकच कर्मचारी हा तागतणावाला दूर करून आपल्या कार्याला वाहून घेणारा आहे. यावेळी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी डॉ. प्रशांत शिंग्वेकर, जी. के. जनवार, के. बी. पाटील, डब्ल्यू. एन. चोपडे यांचा गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. तर शिंग्वेकर व जनवार यांचा मिनल मालधुरे, पाटील व चोपडे यांचा मोनाली तोटे पाटील यांचा सत्कार केला. यावेळी सत्कारमूर्ती डॉ. प्रशांत शिंग्वेकर, जी. के. जनवार, के. बी. पाटील, डब्ल्यू. एन. चोपडे यांनी आपल्या सेवा काळातील अनुभव सांगितले. डॉ. नितीन कोळी, डॉ. ए. बी. नाईक, डॉ. एन. व्ही. फिरके, मिनल मालधुरे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अजय देशमुख उपस्थित होते. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष मंगेश वरखेडे, कोषाध्यक्ष राजेश एडले, संचालक प्रवीण पडोळे यांनी सत्कारमूर्तींचा धनादेश देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी यांनी केले. संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. आभार भांडार विभागाचे अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी मानले.

कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

**सेवानिवृत्ती हा मानवाच्या आयुष्यातील मोलाचा क्षण**

प्रमुख अतिथी डॉ. विद्या शर्मा म्हणाल्या, सेवानिवृत्ती हा आयुष्यातील मोलाचा क्षण असतो आणि कर्मचाऱ्यांच्या भावना देखील त्यांच्या सेवेशी जुळलेल्या असतात. असे असले तरी कामापासून निवृत्ती नाही. कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट सेवा दिल्याचे त्यांच्या कौतुकावरूनच दिसून येते.

हिंदुस्थान

# भावनिक होणे हे कर्मचाऱ्यांचे आपल्या संस्थेप्रती असलेले निःस्सीम प्रेम : कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते





अमरावती दि. ३० : विद्यापीठातून सेवानिवृत्त होत असतांना कर्मचा-यांचे डोळे पाणावतात आणि हेच कर्मचा-यांचे आपल्या संस्थेप्रती असलेले निःस्सी प्रेम दर्शविते, असे उद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विद्या शर्मा, प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी, नियंत्रण अधिकारी रासायनिक तंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए.बी. नाईक, शैक्षणिक विभागाच्या प्रशासकीय केंद्राचे प्रशासकीय अधिकारी डॉ. एन.व्ही. फिरके, आचार्य कक्षाच्या उपकुलसचिव सौ. मिनल मालधुरे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती डॉ. प्रशांत शिम्बेकर, सौ. शिम्बेकर, श्री जी.के. जनवार, सौ. जनवार, श्री के.बी. पाटील, सौ. पाटील, श्री डब्ल्यू. एन. चोपडे, सौ. चोपडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले, कर्मचारी आपल्या कुटुंबाप्रमाणे काम करतात, त्यामुळे कुटुंबातून ते सेवानिवृत्त होत आहेत, असे वाटते. सेवा काळात सहकारी कर्मचा-यांकडून मिळालेले प्रेम, सहकार्य यामुळे सेवानिवृत्तीच्यावेळी कर्मचारी भारावून जातात. विद्यापीठाचा प्रत्येकच कर्मचारी हा ताणतणावाला दूर करुन आपल्या कार्याला वाहून घेणारा आहे, असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना उज्ज्वल भविष्याच्या शुभकामना दिल्या. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी डॉ. प्रशांत शिम्बेकर, श्री जी.के. जनवार, श्री के.बी. पाटील, श्री डब्ल्यू. एन. चोपडे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. तर सौ. शिम्बेकर व सौ. जनवार यांचा सौ. मिनल मालधुरे, सौ. पाटील व सौ. चोपडे यांचा सौ. मोनाली तोटे पाटील यांनी साडी-चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला.

प्रमुख अतिथी डॉ. विद्या शर्मा म्हणाल्या, सेवानिवृत्ती हा आयुष्यातील मोलाचा क्षण असतो आणि कर्मचा-यांच्या भावना देखील त्यांच्या सेवेशी जुळलेल्या असतात. असे असले तरी कामापासून निवृत्ती नाही. कर्मचा-यांनी उत्कृष्ट सेवा दिल्याचे त्यांच्या कौतुकावरुनच दिसून येते, असे सांगून त्यांनी सर्व सत्कारमूर्तींना पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी सत्कारमूर्ती डॉ. प्रशांत शिम्बेकर, श्री जी.के. जनवार, श्री के.बी. पाटील, श्री डब्ल्यू. एन. चोपडे यांनी आपल्या सेवा काळातील अनुभव सांगतांना सहकारी कर्मचा-यांकडून मिळालेल्या प्रेम, स्नेहभावाबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच डॉ. नितीन कोळी, डॉ. ए.बी. नाईक, डॉ. एन.व्ही. फिरके, सौ. मिनल मालधुरे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे श्री अजय देशमुख यांनीही मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्ज्वल भविष्याच्या व दिर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्यात.

विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे, कोषाध्यक्ष श्री राजेश एडले, संचालक श्री प्रवीण पडोळे यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी, सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार भांडार विभागाचे अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

**नवराष्ट्र**

# विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये तीन विद्यार्थी

## भौतिकशास्त्र विभागाची चमकदार कामगिरी

**शैक्षणिक**

▶ अमरावती, ब्युरो. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाने पुन्हा एकदा शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा अधोरेखित केली आहे. विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एम.एससी. भाग-२ (भौतिकशास्त्र) परीक्षेत विभागातील विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत मानाचे स्थान मिळविले आहे. या परीक्षेत राज अनिल पारखी यांनी प्रथम क्रमांक, साक्षी गजानन चोपकर यांनी तृतीय क्रमांक, तर स्नेहल रघुनाथ शिवणकर यांनी पाचवा क्रमांक पटकावून विद्यापीठाचा नावलौकिक वाढविला आहे. या यशामागे भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे यांच्यासह डॉ. जी. जी. मुळे, प्रा. श्वेता वाघमारे, प्रा. प्रियंका गोळे, प्रा. एस. राठोड, प्रा. एन. थोरात, प्रा. व्ही. लोंढे, प्रा. व्ही. भोजार या शिक्षकवृंदाचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. भौतिकशास्त्र विभागातून आतापर्यंत २५ विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकलेत. त्यापैकी अनेक विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्राप्त झाले आहे. विज्ञान स्नातकोत्तर भौतिकशास्त्र अभ्यासक्रम पूर्ण करून विभागातील अनेक विद्यार्थी आज वैज्ञानिक, रेडिओलॉजिस्ट, हवामानशास्त्रज्ञ, फॉरेन्सिक प्रयोगशाळेतील विश्लेषक, आयएएस अधिकारी, वायरलेस स्ट्रीममधील पोलिस अधीक्षक, प्राध्यापक, व्याख्याते, शिक्षक व दूरसंचार अधिकारी अशा विविध प्रतिष्ठित पदांवर कार्यरत आहेत. विभागामध्ये शैक्षणिक मूल्यांची जोपासना, शिस्त-दृढ वातावरण, संशोधनासाठी प्रोत्साहन, विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक व प्रभावी वृत्ती विकसित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात.

**पुण्यनगरी**

# ओव्हरऑल चॅम्पियनशिप मिळविणाऱ्या चमूंचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार



अमरावती : छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम विद्यापीठात पार पडलेल्या ३९ व्या आंतर विद्यापीठ मध्य विभाग युवा महोत्सवात विद्यापीठाच्या संघाने ओव्हरऑल चॅम्पियनशिप पटकाविली. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते विजयी कलावंत आणि मार्गदर्शकांचा सत्कार करण्यात आला. आगामी काळात चेन्नई येथे होणा-या राष्ट्रीय स्तरावरील युवा महोत्सवातही विद्यापीठाचा संघ आपली विजयाची परंपरा कायम राखेल, असा विश्वास कुलगुरूंनी यावेळी व्यक्त केला. विजेत्या चमूचे आगमन होताच विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून संविधान शिल्पापर्यंत ट्रॉफीसह त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी सर्व कलावंत व प्रशिक्षकांचे स्वागत केले.

# पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बॅडमिंटन (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

अमरावती दि. २३ : आय.टी.एम. युनिव्हर्सिटी, ग्वालियर येथे ०६ ते ११ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बॅडमिंटन (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा सौम्यादीप सहा, जी.एस. महाविद्यालय, खामगांवचा अर्नव निंबाळकर, सार्थक काटकर, रुद्र कचरे व पवन वानरे, इंदिरा महाविद्यालय, कळंबचा मयूर वाळगुंजे, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा पार्थ गाला व एस.एस.जी.एम.सी.ई. शेगांवचा रुद्रेश लटारे याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे दि. २५ डिसेंबर, २०२५ ते ०३ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

## देशोन्नती

# विद्यापीठाचा खेळाडू यशदीप भोगे याला एशियन आर्चरी चॅम्पियनशिपमध्ये सुवर्ण पदक



## लॉस एंजेलिस येथे होणा-या ऑलम्पिकमध्ये करणार भारताचे प्रतिनिधित्व

देशोन्नती वृत्तसंकलन

**अमरावती** : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा खेळाडू यशदीप संजय भोगे याने बांगलादेशची राजधानी ढाका येथील आर्मी स्टेडियम येथे ७ ते १४ नोव्हेंबर दरम्यान झालेल्या एशियन आर्चरी चॅम्पियनशिपमध्ये दक्षिण कोरियाच्या खेळाडूचा पराभव करीत सुवर्ण पदकावर नाव कोरले. या स्पर्धेमध्ये आशिया खंडातील जवळपास १८ देशांचे खेळाडू सहभागी झाले होते. अमेरिकेमधील लॉस एंजेलिस येथे २०२८ मध्ये होणा-या ऑलम्पिकमध्ये यशदीप हा आर्चरी खेळ प्रकारात भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. या अभूतपूर्व यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी यशदीप भोगे याचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून विद्यापीठाच्यावतीने सत्कार केला.

यशदीप हा विद्यापीठाशी संलग्नित डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचा विद्यार्थी असून रेल्वे प्रशासनामध्ये सध्या तो कार्यरत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या खेळाडूने मिळविलेले हे यश विद्यापीठाचेच नाही, तर महाराष्ट्र आणि देशाचा नावलौकीक करणारे आहे, असे गौरवोद्गार याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी व्यक्त केले. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, यशदीपचे वडील संदीप भोगे उपस्थित होते.

## जनमाध्यम

### संक्षिप्त

### विद्यापीठात कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांना अभिवादन



अमरावती-कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्ताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गाडगे बाबा अध्यासन केंद्रात पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी प्रभारी कुलसचिव तथा परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. तसेच मुख्य प्रवेशद्वारा समोरील श्री संत गाडगे बाबांच्या संदेशशिल्पाला पुष्पार्पण करुन अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाला माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, संगणक केंद्र प्रमुख डॉ. सुहास पाचपांडे, श्री संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. दिलीप काळे, महानुभाव अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. महंत सोनोनेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधाराचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे, प्रा.डॉ. संयोगिता देशमुख, प्रा.डॉ. प्रणव कोलते, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, डॉ. सुलभा पाटील,मोनाली तोटे पाटील,मिनल मालधुरे, डॉ. साक्षी ठाकूर, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, उद्यान अधीक्षक अनिल घोम, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्याबद्दल माहिती संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. दिलीप काळे यांनी केले.

## पुण्यनगरी

### विद्यापीठात श्रीसंत गाडगेबाबा यांचा पुण्यतिथी कार्यक्रम



अमरावती : श्रीसंत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्ताने विद्यापीठाच्या गाडगेबाबा अध्यासन केंद्रात पुण्यतिथी कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रभारी कुलसचिव तथा परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी श्रीसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठाच्या वतीने अभिवादन केले. तसेच मुख्य प्रवेशद्वारासमोरील श्रीसंत गाडगेबाबांच्या संदेशशिल्पाला पुष्पार्पण करून अभिवादन करण्यात आले. पुण्यतिथी कार्यक्रमाला माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, संगणक केंद्रप्रमुख डॉ. सुहास पाचपांडे, गाडगेबाबा अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. दिलीप काळे, महानुभाव अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. महंत सोनोनेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधाराचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे, प्रा.डॉ. संयोगिता देशमुख, प्रा.डॉ. प्रणव कोलते, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, डॉ. सुलभा पाटील, मोनाली तोटे पाटील, मिनल मालधुरे, डॉ. साक्षी ठाकूर, राजेश एडले, उद्यान अधीक्षक अनिल घोम, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

## स.गा.बा.अ.वि.ला महाराष्ट्र व गोवा राज्याचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान

### जयपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय एकात्मता शिबीरात विद्यापीठाचे स्वयंसेवक सहभागी होणार



अमरावती दि. ४ :– भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व खेल मंत्रालयामार्फत दि. २५ ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीत एस.एस.जैन सुबोध पी.जी कॉलेज, रामबाग सर्कल, जयपूर, राजस्थान येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय राष्ट्रीय एकात्मता शिबीर होत आहे. राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृध्दींगत व्हावी, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि देशभक्तीचे संस्कार रुजविल्या जावे, या हेतुने सदर शिबीराचे आयोजन करण्यात आले असुन देशभरातील ११ राज्यांचे स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे या शिबीराकरिता महाराष्ट्र व गोवा राज्याचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान एकमेव संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला प्राप्त झाला आहे.

विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी यासाठी विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना संस्कारक्षम, सदृढ व सक्षम बनविण्यासाठी नियमितपणे समाजप्रबोधनाचे कार्य अविरतपणे करीत आहे. नियमीत उपक्रमाद्वारे महापुरुषांचे विचार हे जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमातून घेऊन श्रमदान, युवा सप्ताह, कार्यशाळा, शिबीर व सरकारच्या विविध कार्यक्रमांत स्वयंसेवक विद्यार्थी सहभागी होत असतात.

चमूमध्ये प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेराचा रोहन बानखडे, श्री. एस. विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांवचा हिमांशु राठी, पुसद [illegible] समाजकार्य महाविद्यालय, पुसदचा एकनाथ काळे, कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबचा कृष्णा घरडीनकर, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावतीचा कुणाल इंगळे, श्री. वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणीची कु. प्रियंका म्हस्के, श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोटची कु. विजया अस्वार, श्री. शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखलीची कु. वैभवी मोरगंगे, श्री. रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय, वाशिमची कु. वैष्णवी पानझडे व [illegible] इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, दारापुरची कु. संस्कृती खरडे यांचा समावेश आहे. कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू यांच्या मार्गदर्शनात श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या [illegible] महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. [illegible] दहा विद्यार्थ्यांची चमू घेऊन चमू व्यवस्थापक म्हणून महाराष्ट्र व गोव्याचे प्रतिनिधित्व करण्याकरीता जयपूरला रवाना होणार आहे.

कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते यांनी सर्व स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन ही बाब विद्यापीठाकरिता अभिमान व गौरवास्पद असून विद्यापीठाचे नाव उंचावणारी असल्याच्या [illegible] व्यक्त केल्या. प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, रासेयो चे संचालक डॉ. निलेश कडू यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या.

लोकमत, मंगळवार, दि. ९ डिसेंबर २०२५

## विद्यापीठात जगनाडे महाराज जयंती



अमरावती : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महाराष्ट्राच्या संत परंपरेतील थोर संत श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

वृत्त केसरी

### विद्यापीठाला राष्ट्रीय एकात्मता शिबीराकरीता

## महाराष्ट्र व गोवा राज्याचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान

प्रतिनिधी/वृत्त केसरी

अमरावती, ४ डिसेंबर: भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व खेल मंत्रालयामार्फत 25 ते 31 डिसेंबर या कालावधीत एस.एस.जैन सुबोध पी.जी कॉलेज, रामबाग सर्कल, जयपूर, राजस्थान येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय ''राष्ट्रीय एकात्मता शिबीर'' होत आहे.



राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृध्दींगत व्हावी, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि देशभक्तीचे संस्कार रुजविल्या जावे, या हेतुने सदर शिबीराचे आयोजन करण्यात आले असुन देशभरातील 11 राज्यांचे स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. राष्ट्रीय सेवा योजना नियमीत उपक्रमाद्वारे महापुरुषांचे विचार हे जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमातून घेऊन श्रमदान, युवा सप्ताह, कार्यशाळा, शिबीर व सरकारच्या विविध कार्यक्रमांत स्वयंसेवक विद्यार्थी सहभागी होत असतात. चमूमध्ये बडनेराचा रोहन बानखडे, खामगांवचा हिमांशु राठी, पुसदचा एकनाथ काळे, बोरी अरबचा कृष्णा घरडीनकर, अमरावतीचा कुणाल इंगळे, धारणीची प्रियंका म्हस्के, अकोटची विजया अस्वार, चिखलीची वैभवी मोरगंगे, रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय, वाशिमची वैष्णवी पानझडे व दारापुरची संस्कृती खरडे यांचा समावेश आहे.

आपली मातृभूमि

# विद्यापीठाच्या ज्युनियर हॅकेथॉनमध्ये विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला पंख

**✻ कुलगुरू मिलींद बारहाते यांचे प्रतिपादन ✻ शालेय विद्यार्थ्यांचा भरभरुन प्रतिसाद ✻ विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध विषयावरील संशोधन मॉडेलसचे प्रदर्शन**





प्रतिनिधी/४ डिसेंबर

अमरावती : शालेय वयातच विद्यार्थ्यांनी कल्पनाशक्ती पलिकडे तयार केलेल्या विविध विषयांवरील संशोधन मॉडेल्स पाहून विद्यार्थ्यांच्या कल्पनांना पंख फुटले असा एकंदरीत सूर प्रदर्शनीमधील मॉडेल्स पाहून निघाला. त्यामुळे शालेय विद्यार्थी भविष्यात निश्चितच उंच भरारी घेतील, हे निश्चित. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पुढाकाराने शालेय विद्यार्थ्यांसाठी 'ज्युनियर हॅकेथॉन-२०२५' चे आयोजन करण्यात आले. इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेला भरभरून प्रतिसाद देत आपापल्या कल्पनांनी तयार केलेली विविध विषयांवरील संशोधन मॉडेल्स यावेळी सादर करण्यात आलीत. प्रदर्शनीचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते झाले. यावेळी महानगरपालिकेच्या आयुक्त डॉ. सौम्या शर्मा (चांडक) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, डॉ. सौम्या शर्मा (चांडक) यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेली संशोधन मॉडेल्स पाहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांच्या मॉडेल्सची माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांनी सुध्दा संशोधन मॉडेल्स कशी आणि किती फायदेशीर आहेत, त्यांच्या मॉडेल्सचे उपयोग यावेळी मान्यवरांना सांगितले. विद्यापीठ अंतर्गत असलेल्या इन्क्युबेशन सेंटर व वैष्णविका स्टार्टअप यांच्या संयुक्त विद्यमाने ही ज्युनियर हॅकेथॉन-२०२५ स्पर्धा आयोजित करण्यात आली. त्यासाठी टेक्नॉलॉजी अँन्ड डिजिटल इनोव्हेशन, एन्व्हायर्मेंट अँन्ड सस्टेनेबिलिटी, हेल्थ अँन्ड वेलबिइंग, ओपन थिम असे विषय ठेवण्यात आले होते. इयत्ता ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेली विविध विषयांवरील मॉडेल्स सादर केलीत. यावेळी इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव, इन्क्युबेशन सेंटरचे सर्व अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

**अमरावतीत आय.टी. पार्क व्हावा- आयुक्त-** या कार्यक्रमादरम्यान शहराच्या विकासाच्या दृष्टीने एक महत्वाची चर्चा झाली. मनपा आयुक्त सौम्या शर्मा (चांडक) यांनी अमरावतीत आय.टी. पार्क काळाची गरज असल्याचे सांगून शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना प्रगल्भ बनविणे गरजेचे आहे. त्यामुळे भविष्यात हे आपले उज्वल जीवन घडवू शकतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. तर कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी सुध्दा आय.टी. पार्कसाठी प्रयत्न सुरु असल्याचे सांगून शासनाकडे सुध्दा याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यात आला असल्याचे सांगितले. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर यांनीही यावेळी मनपा आयुक्त यांना उपक्रमांबाबतची माहिती दिली.

**विद्यापीठाला राष्ट्रीय एकात्मता शिबीराकरिता**

# महाराष्ट्र व गोवा राज्याचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान

**जयपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय एकात्मता शिबीरात विद्यापीठाचे स्वयंसेवक सहभागी होणार**



प्रतिनिधी/४ डिसेंबर

अमरावती : भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व खेल मंत्रालयामार्फत दि. २५ ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीत एस.एस.जैन सुबोध पी.जी कॉलेज, रामबाग सर्कल, जयपूर, राजस्थान येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय राष्ट्रीय एकात्मता शिबीर होत आहे. राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृध्दींगत व्हावी, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि देशभक्तीचे संस्कार रुजविल्या जावे, या हेतुने सदर शिबीराचे आयोजन करण्यात आले असुन देशभरातील ११ राज्याचे स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे या शिबीराकरिता महाराष्ट्र व गोवा राज्याचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान एकमेव संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला प्राप्त झाला आहे.

विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णूता, सामाजिक बांधिलकी यासाठी विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना संस्कारक्षम, तत्पर व सक्षम करण्यासाठी नियमितपणे समाजप्रबोधनाचे कार्य अविरतपणे करीत आहे. नियमीत उपक्रमाद्वारे महापुरुषांचे विचार हे जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमातून घेऊन श्रमदान, युवा सप्ताह, कार्यशाळा, शिबीर व सरकारच्या विविध कार्यक्रमांत स्वयंसेवक विद्यार्थी सहभागी होत असतात.

यामध्ये प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड मॅनेजमेंट, बडनेराचा रोहन वानखडे, जी. एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांवचा हिमांशु राठी, गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय, पुसदचा एकनाथ काळे, कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबचा कृष्णा परडीनकर, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावतीचा कुणाल इंगळे, श्री. वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणीची कु. प्रियंका मास्के, श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोटची कु. विजया अस्वार, श्री. शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखलीची कु. वैष्णवी मोरांगे, श्री. रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय, वाशिमची कु. वैष्णवी पाचखडे व तक्षशिला इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी, दारापुरची कु. संस्कृती खरडे यांचा समावेश आहे. कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू यांच्या मार्गदर्शनात श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. हर्षाली वानखडे सदर विद्यार्थ्यांची चमू घेऊन चमू व्यवस्थापक म्हणून महाराष्ट्र व गोव्याचे प्रतिनिधित्व करण्याकरीता जयपूरला रवाना होणार आहे. कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते यांनी सर्व स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे भरभरुन कौतुक करुन ही बाब विद्यापीठाकरिता अभिमान व गौरवास्पद असून विद्यापीठाचे नाव उंचावणारी असल्याच्या सद्भावना यावेळी व्यक्त केल्या. प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, रासेयो चे संचालक डॉ. निलेश कडू यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या.

आपली मातृभूमि

विद्यापीठातील इनोव्हेशन इन्क्युबेशन ॲन्ड लिंकेजेस आयोजित

# विद्यार्थ्यांनो, नोकरी घेण्यापेक्षा देणारे व्हा

✱ डॉ.अजय लाड यांचे प्रतिपादन ✱ 'बिझिनेस प्लॅन स्पर्धा'ला नवउद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी/६ डिसेंबर

अमरावती -उद्योन्मुख तरुणांनी नोकरी घेणा-यापेक्षा देणारे व्हा, असे आवाहन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाद्वारा आयोजित 'बिझिनेस प्लॅन स्पर्धा'-२०२५ ' कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून अमरावती एमआयडीसी असोसिएशनचे सचिव श्री आशिष सावजी, इनक्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरुळकर उपस्थित होते.





डॉ. अजय लाड म्हणाले, प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या महाविद्यालयात छोट्या स्वरुपात ॲक्टिव्हिटी बेस बिझिनेस प्लॅन राबवावे, तसेच विद्यार्थ्यांना छोट्या स्वरुपात भांडवल उपलब्ध करुन द्यावे. कुठल्याही व्यवसायाची सुरुवात ही छोट्याशा प्रयत्नापासून होत असते, असेही ते म्हणाले.

श्री आशिष सावजी म्हणाले, बिझिनेस प्लॅन हा कागदावरुन प्रत्यक्षात साकारण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावे. नवीन व्यवसाय सुरु करतांना प्रत्येकांनी संधीशोधक असले पाहिजे. जिथे आपल्याला संधी मिळते, त्या संधीचे सोने करण्याचा प्रयत्न करावा, असे ते म्हणाले. विद्यापीठात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान पी.एम. उषा अंतर्गत बोर्ड ऑफ इनोवेशन इन्क्युबेशन ॲन्ड लिंकेजेस आणि रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने या एकदिवसीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना मूर्त रुप देण्याकरिता व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले. उद्योजकता, नवोपक्रम आणि व्यवसाय नियोजनाची कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावी हा यामागील उद्देश होता. तंत्रज्ञान, कृषी, आरोग्यसेवा आणि शाश्वत विकास या प्रकारात नवउद्योजकांनी व्यवसाय कल्पना, उद्दिष्ट, धोरणे, व्यवसाय मॉडेल्स तसेच आर्थिक अंदाज यानुसार आपल्या बिझनेस प्लॅन चे सादरीकरण यावेळी केले. नवउद्योजकांनी सादर केलेल्या योजनांचे तज्ज्ञ परीक्षक मंडळाने मूल्यांकन केले. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक श्री आनंद यादव, सूत्रसंचालन श्री अमोल हिरुळकर यांनी केले. कार्यक्रमाला याप्रसंगी जिल्ह्यांमधील विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

पुण्य नगरी

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, कार्यपूर्तीचा संकल्प करावा

**कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांचे प्रतिपादन**

**विद्यापीठात महापरिनिर्वाणदिनानिमित अभिवादन कार्यक्रम**




**पुण्य नगरी / प्रतिनिधी**

अमरावती : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वोत्कृष्ट संविधान या देशाला प्रदान करून खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता लोकशाहीच्या माध्यमातून नागरिकांना दिली. त्यांचे भारतीयांवर फारमोठे उपकार असून त्यांनी केलेले कार्य आणि दिलेले विचार पूर्ण करण्यासाठी प्रत्येकाने त्यांचा महापरिनिर्वाणदिन संकल्पदिन म्हणून साजरा करावा, असे मत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी व्यक्त केले.

डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्या वतीने डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्रामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित केला होता. त्याप्रसंगी अध्यक्षस्थावरून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे उपस्थित होते. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी म्हणाले, बाबासाहेबांमुळेच या देशामध्ये दलित, वंचित व शोषितांना समान संधी मिळाली. यावेळी डॉ. मोना चिमोटे यांनी आपले मत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. संतोष बनसोड, संचालन व आभार डॉ. रत्नशील खोब्रागडे यांनी केले.

पुण्य नगरी

# 'ज्युनिअर हॅकेथॉन'; शालेय विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे प्रदर्शन

## विद्यापीठातील 'इन्क्युबेशन सेंटर' व मेधावाटिका स्टार्टअपचा संयुक्त उपक्रम

पुण्य नगरी / प्रतिनिधी



अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पुढाकारातून शालेय विद्यार्थ्यांसाठी 'ज्युनिअर हॅकेथॉन-२०२५' चे आयोजन करण्यात आले. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आपापल्या कल्पनांनी तयार केलेली विविध विषयांवरील संशोधन मॉडेल्स यावेळी सादर केली आहे.

शालेय वयातच विद्यार्थ्यांनी कल्पनाशक्तीपलिकडे तयार केलेल्या विविध विषयांवरील संशोधन मॉडेल्स पाहून विद्यार्थ्यांच्या कल्पनांना पंख फुटले, असा सूर मान्यवरांनी व्यक्त केला. प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते झाले.

यावेळी महानगरपालिकेच्या आयुक्त डॉ. सौम्या शर्मा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, डॉ. सौम्या शर्मा यांनी विद्यार्थ्यांचे संशोधन मॉडेल्स पाहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांच्या मॉडेल्सची माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांनीसुद्धा संशोधन मॉडेल्स कशी आणि किती फायदेशीर आहेत, त्यांच्या मॉडेल्सचे उपयोग यावेळी मान्यवरांना सांगितले. विद्यापीठ अंतर्गत असलेल्या इन्क्युबेशन सेंटर व मेधावाटिका स्टार्टअप यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. त्यासाठी 'टेक्नॉलॉजी अँण्ड डिजिटल इनोव्हेशन', 'एन्व्हायर्मेंट अँण्ड सस्टेनेबिलिटी', 'हेल्थ अँण्ड वेलबिईंग', 'ओपन थिम' असे विषय ठेवण्यात आले होते. यावेळी इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव उपस्थित होते.

**महापालिका आयुक्तांनी व्यक्त केली आयटी पार्कची गरज**

• अमरावतीत आय. टी. पार्क काळाची गरज असल्याचे सांगून शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना प्रगल्भ बनविणे गरजेचे आहे, असे मत महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी व्यक्त केले. त्यावेळी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनीसुद्धा आय. टी. पार्कसाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगून शासनाकडे याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यात आला असल्याची माहिती दिली.

आपली मातृभूमि

## विद्यापीठाच्या ज्युनियर हॅकेथॉनमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना पुरस्कार

# आजचे विद्यार्थी हे उद्याचे संशोधक व उद्योजक

### प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी/९ डिसेंबर



अमरावती : आजचे विद्यार्थी हे उद्याचे संशोधक आणि उद्योजक आहेत आणि अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील समस्या सोडवण्याची क्षमता विकसित होते, असे प्रतिपादन अध्यक्षीय भाषणातून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील इन्क्युबेशन फाऊंडेशन, आय.क्यू.ए.सी. व मेधावाटिका अँडलॅब्स प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित ज्युनियर हॅकेथॉनमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांच्या बक्षिस वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता अमरावतीचे उपायुक्त श्री. द. ल. ठाकरे, इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्यात. ज्युनियर श्रेणीमध्ये श्री समर्थ हायस्कुल, अमरावतीचे विद्यार्थी समर्थ देवगिरीकर, तुषार सोपान काजे यांना प्रथम व ३ हजार रूपये रोख, शिवाजी मल्टीपर्पज उच्च माध्यमिक शाळेचे विद्यार्थी अद्वेता चौधरी, सोहम माहुलकर द्वितीय व २ हजार रूपये रोख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय, पिंपरी ता. चांदूर बाजारचे विद्यार्थी भावेश गोपाल सोसे, नमन सोनारे, आदित्य तायडे यांना तृतीय बक्षीस व एक हजार रूपये रोख स्व.गणुजी बापुजी भोकरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रदान करण्यात आले. सिनियर श्रेणीमध्ये मणिबाई गुजराती हायस्कुलचे विद्यार्थी ओम देशमुख, समर्थ विधाते, श्रावण कोंडे यांना प्रथम बक्षीस व ३ हजार रूपये रोख, शिवाजी मल्टीपर्पज उच्च माध्यमिक शाळेचे विद्यार्थी प्रेम च-हाटे द्वितीय व २ हजार रूपये रोख, गुरुकुल इंग्लिश मिडियम स्कुल, दिग्रसचे विद्यार्थी अर्जुन दुधाने, अजय राठोड, अर्थव रुद्राक्षवर यांना तृतीय व एक हजार रूपये रोख स्व. श्री. अशोकराव हिरूळकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रदान करण्यात आले. तर प्रोत्साहनपर बक्षिस शाश्वत कन्सेप्ट स्कुलचे विद्यार्थी एकांश गवई, भव्य डेंबला यांना प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरूळकर, नरेश मोवाळे, रवी ढंगळे, प्रशिक्षणार्थी भावेश वारके, प्रज्वल वानखडे, कोमल काळबांडे, मेधवाटिकाचे डॉ. केतकी कालेले, राहुल चूटे यांनी अथक परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत

# आजचे विद्यार्थी उद्याचे संशोधक व उद्योजक

**प्र-कुलगुरू डॉ. ढोरे यांचे प्रतिपादन**

**हॅकेथॉनच्या विजेत्या विद्यार्थ्यांना पुरस्कार**

अमरावती, १७ डिसेंबर

आजचे विद्यार्थी हे उद्याचे संशोधक आणि उद्योजक आहेत आणि अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील समस्या सोडवण्याची क्षमता विकसित होते, असे प्रतिपादन अध्यक्षीय भाषणातून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले.

अमरावती विद्यापीठातील इन्क्युबेशन फाऊंडेशन, आयक्यूएसी व मेधावाटिका ॲडलॅब्स प्रा. लि. यांच्या संयुक्त वतीने इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित ज्युनियर हॅकेथॉनमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात ते मार्गदर्शन करत होते. प्रमुख अतिथी म्हणून कौशल्य



विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देताना डॉ. महेंद्र ढोरे

विकास, रोजगार आणि उद्योजकता अमरावतीचे उपायुक्त द. ल. ठाकरे, इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर उपस्थित होते.

ज्युनियर श्रेणीमध्ये समर्थ हायस्कूल, अमरावतीचे विद्यार्थी समर्थ देवगिरीकर, तुषार काळे यांना प्रथम पारितोषिक व ३ हजार रुपये रोख, शिवाजी मल्टीपर्पज उच्च माध्यमिक शाळेचे विद्यार्थी अद्वेता चौधरी, सोहम माहुलकर यांना द्वितीय पारितोषिक व २ हजार रुपये रोख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय, पिंपरी ता. चांदूर बाजारचे विद्यार्थी भावेश सोसे, नमन सोनारे, आदित्य तायडे यांना तृतीय पारितोषिक व एक हजार रुपये रोख स्व. गणुजी बापुजी भोकरे यांच्या स्मृत्यर्थ देण्यात आले.

सिनियर श्रेणीमध्ये मणिबाई गुजराती हायस्कूलचे विद्यार्थी ओम देशमुख, समर्थ विघाते, श्रावण कोंडे यांना प्रथम बक्षीस व ३ हजार रुपये रोख, शिवाजी मल्टीपर्पज उच्च माध्यमिक शाळेचा विद्यार्थी प्रेम चऱ्हाटे याला द्वितीय व २ हजार रुपये रोख, गुरुकुल इंग्लिश मिडियम स्कूल, टिमसचे विद्यार्थी अर्जुन दुधाने, अजय राठोड, अर्थव रुद्राक्षवार यांना तृतीय पारितोषिक व एक हजार रुपये रोख स्व. अशोक हिरुळकर यांच्या स्मृत्यर्थ देण्यात आले. प्रोत्साहनपर बक्षीस शाश्वत कन्सेप्ट स्कूलचे विद्यार्थी एकांश गवई, भव्य डेबला यांना दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरुळकर, नरेश मोघाळे, रवी ढेंगळे, प्रशिक्षणार्थी भावेश वारके, प्रज्वल वानखडे, कोमल काळबांडे, मेधावाटिकाच्या डॉ. केतकी काळेले, राहुल चुटे यांनी परिश्रम घेतले.

(तभा वृत्तसेवा)

TheHitavada

# SGBAU organises free nutrition guidance, blood test camp for hostel students

■ Amravati Bureau
AMRAVATI, Dec 17

THE Health Centre of Sant Gadge Baba Amravati University (SGBAU) organised a free nutrition guidance and blood test camp for students residing in the university hostels, the other day. The initiative was aimed at promoting and maintaining the health of students within the campus.

The programme was attended by Dr Milind Barhate, Vice-Chancellor of Sant Gadgebaba Amravati University, Dr Dipali Bhaisne, nutrition expert, Dr Smita Thorat, Health Officer and Chandrashekhar Lokhande, Hostel Warden.

During her session, Dr Dipali Bhaisne advised students to make healthy food choices to prevent heart disease and diabetes. She recommended including home-cooked meals and fresh fruits as much as possible



Dr Milind Barhate and others present for the camp

in their daily diet for maintaining physical fitness.

In his presidential address, Dr Milind Barahate emphasised that exercise is as important as a proper diet.

He encouraged students to participate in outdoor sports and avoid excessive dependence on mobile devices. Dr Smita Thorat, Health Officer highlighted the objectives behind organising the camp, while the programme was conducted by Mohini Rathod. A team from the District General Hospital assisted in the blood testing process.

The camp benefited 53 boys and 46 girls. Special appreciation was extended to Sachin Balapure from the Health Department for his dedicated efforts in ensuring the success of the programme.

लोकमत

# विद्यापीठात कर्मयोगी संत गाडगेबाबांची पुण्यतिथी

लोकमत न्यूज नेटवर्क

अमरावती : कर्मयोगी संत गाडगे बाबा यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्ताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गाडगे बाबा अध्यासन केंद्रात पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी प्रभारी कुलसचिव तथा परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठाच्या वतीने अभिवादन केले, तसेच मुख्य प्रवेशद्वारासमोरील श्री संत गाडगे बाबांच्या संदेशशिल्पाला पुष्पार्पण करून अभिवादन करण्यात आले.



संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन करतांना अधिकारी व कर्मचारी

पुण्यतिथी कार्यक्रमाला माजी प्र-कुलगुरू डॉ.प्रसाद वाडेगावकर, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ.श्रीकांत पाटील, संगणक केंद्रप्रमुख डॉ.सुहास पाचपांडे, श्री संत गाडगेबाबा अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. दिलीप काळे, महानुभाव अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. महंत सोनपेठकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारधाराचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे, प्रा. डॉ. संयोगिता देशमुख, प्रा. डॉ. प्रणव कोलते, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, डॉ. सुलभा पाटील, मोनाली तोटे पाटील, मीनल मालधुरे, डॉ. साक्षी ठाकूर, उपअभियंता (विद्युत) राजेश एडले, उद्यान अधीक्षक अनिल घोम, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, तसेच विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व कर्मयोगी संत गाडगे बाबा यांच्याबद्दल माहिती संत गाडगेबाबा अध्यासन केंद्रप्रमुख डॉ.दिलीप काळे यांनी केले.

हिंदुस्थान

# विद्यार्थ्यांनी मूल्यांची जपवणूक व कर्तव्यांची जाणीव ठेवावी : डॉ. मनिषा कोडापे

अमरावती दि. २६ : इतिहास हा भावी पिढीला दिशादर्शक असतो. इतिहासातून आपण काय घेतले पाहिजे, हे महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्याकरिता मूल्यांची जपवणूक आणि आपल्या कर्तव्यांची जाणीव या गोष्टींना आपल्या जीवनात सर्वोच्च महत्व दिले पाहिजे. पालकांनी आपले पाल्य संस्कारक्षम कसे होतील, या उद्देशाने त्यांना शिक्षित करावे, असे प्रतिपादन विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे यांनी व्यक्त केले. शीख धर्माचे दहावे गुरु गोविंद यांचे सुपुत्र साहिबजादा बाबा जोरावर सिंहजी आणि साहिबजादा बाबा फतेह सिंहजी यांच्या सर्वोच्च बलिदानाच्या स्मृतिप्रित्यर्थ देशभर वीर बाल दिवस संपन्न होतो. त्यानिमित्ताने विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग आणि ज्ञानस्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वीर बाल दिवस कार्यक्रमप्रसंगी मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे,



आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील व विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

डॉ. मनिषा कोडापे पुढे म्हणाल्या, आजच्या पिढीला सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत. पालकसुद्धा आपल्या मुलांची अधिक जास्त काळजी घेतात, असे असले तरी, मुलांनी सोशल मिडीयाचा योग्य मूल्यांसाठी वापर करावा. त्यांनी चांगले ज्ञान संपादित करुन आपले करिअर घडवावे व देशाच्या विकासासाठी सदैव तत्पर रहावे, असे त्यांनी सांगितले.

डॉ. श्रीकांत पाटील म्हणाले, औरंगजेबाने केलेल्या अन्यायाला शीख समुदायाने समर्पणाने तोंड दिले. शीख समुदायाने मोठा इतिहास घडविला असून आजच्या विद्यार्थ्यांनी वीर बालकांपासून प्रेरणा घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. वैशाली गुडधे म्हणाल्या, २२ डिसेंबर, २०२२ पासून वीर बाल दिवस हा कार्यक्रम सुरु झाला आहे. साहिबजादा बाबा जोरावर सिंहजी आणि साहिबजादा बाबा फतेह सिंहजी हे मृत्युमुखी पडले, त्यांची देशभक्ती त्यातून दिसून येते. पालकांसाठी सुद्धा ही घटना महत्त्वाची असून आपल्या मुलांना कशाप्रकारे संस्कार व मूल्ये द्यावीत, याचा बोध या घटनेतून मिळतो. यावेळी छत्रपती संभाजी महाराज आणि कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

सुरुवातीला कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी साहिबजादा बाबा जोरावर सिंहजी आणि साहिबजादा बाबा फतेह सिंहजी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी, तर आभार श्री विशाल बाचले यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिव्य मराठी

कुलगुरू डॉ. बारहाते • जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ : विभागीय पात्रता फेरी उत्साहात

# माझी संकल्पना-सर्वोत्कृष्ट संकल्पना स्पर्धेत आत्मविश्वासाने सहभागी व्हा

प्रतिनिधी | अमरावती

जागतिक स्तरावर तरुणांच्या कौशल्यांना वाव देणारी जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी आयोजित करण्यात आलेली विभागीय पात्रता फेरी बुधवार २४ रोजी उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विभागातील अनेक गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यांचे प्रदर्शन घडवले. स्पर्धेच्या माध्यमातून अमरावती विभागातील प्रतिभावान युवक-युवतींना आपले कौशल्ये जागतिक स्तरावर सिद्ध करण्याची आणि अमरावती विभागाचे नाव उंचावण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. माझी संकल्पना-सर्वोत्कृष्ट संकल्पना या आत्मविश्वासाने स्पर्धेत सहभागी व्हा, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना कुलगुरू बारहाते म्हणाले की, अमरावती विभागातील युवकांच्या कौशल्यांना जागतिक स्तरावर नेण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग प्रयत्नशील असून येथील तरुणाईमध्ये ती कौशल्ये असल्याचा विश्वास कुलगुरूंनी यावेळी व्यक्त केला. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या डॉ. श्रीकांत जिचकार सभागृह आयोजित करण्यात आलेल्या



विभागीय पात्रता फेरीचे उद्घाटन करतांना कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते व इतर

या विभागीय पात्रता स्पर्धेत विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशीम या पाच जिल्ह्यातील १६ ते २४ या वयोगटातील ६३ प्रकारच्या परंपरागत आणि आधुनिक कौशल्य गटातील उमेदवारांनी सहभाग नोंदवला. विभागीय कौशल्य स्पर्धेत ११४ उमेदवारांची चाचणी घेण्यात आली. ही स्पर्धा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील वेगवेगळ्या केंद्रांवर तसेच डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण अमरावती, फेड इन्फो, रेडीयंट हॉस्पिटल येथे आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमास संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ प्र. कुलसचिव डॉ. नितीन कोळी, उपायुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता ठाकरे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र प्रांजली बारस्कर, संचालक निशांत शिंघल, हेल्थी रिफायनरी प्रायव्हेट लिमिटेड अमरावतीचे पुष्कर हाते, संचालक तसेच महाराष्ट्र राज्य प्रमुख, सीआयआय, उपसंचालक सुधा ठोंबरे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण-संस्था अमरावतीचे संचालक इनक्युबेशन सेंटर स्वाती शेरेकर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती हे उपस्थित होते. या उद्घाटनिय कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अमोल मोहोड, कौशल्य विकास विभाग यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कौशल्य विकास विभागीय कार्यालय, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तसेच सीआयआयचे पदाधिकारी तसेच इंक्युबेशन सेंटर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांद्वारे विविध कौशल्यांचे सादरीकरण

जागतिक कौशल्य स्पर्धेत सहभागी होण्यास इच्छुक अमरावती विभागातील विविध महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी, नव संशोधकांनी विभागीय चाचणीत त्यांच्या कौशल्याचे सादरीकरण केले. प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये वेगळे कौशल्य असतो, ते मग वैज्ञानिक प्रयोग असोत किंवा शेती सुलभ करणारे, आरोग्याशी संबंधित विविध उपकरणे असोत, माहिती तंत्रज्ञान असो किंवा अगदी सर्वसामान्य उपयोगी वस्तुंबाबत प्रयोग असोत, अशा विविध कौशल्यांचे सादरीकरण १०० वर विद्यार्थ्यांनी केले. त्यातून काहींची जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे.

आपली मातृभूमि

# माझी संकल्पना सर्वोत्कृष्ट संकल्पना या आत्मविश्वासाने स्पर्धेत सहभागी व्हा

कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे प्रतिपादन







कौशल्य स्पर्धेत विभागातील ११४ उमेदवारांचा सहभाग

दैनिक दिव्य मराठी

मार्गदर्शन • डॉ. मनिषा कोडापे : विद्यापीठात वीर बाल दिवसाचे आयोजन

# विद्यार्थ्यांनी मूल्यांची जपवणूक अन् कर्तव्यांची जाणीव ठेवावी

प्रतिनिधी | अमरावती



विद्यापीठात वीर बाल दिवसाचे आयोजन करण्यात आले होते.

इतिहास हा भावी पिढीला दिशादर्शक असतो. इतिहासातून आपण काय घेतले पाहिजे, हे महत्वाचे असून विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्याकरीता मूल्यांची जपवणूक आणि आपल्या कर्तव्यांची जाणीव या गोष्टींना आपल्या जीवनात सर्वोच्च महत्व दिले पाहिजे. पालकांनी आपले पाल्य संस्कारक्षम कसे होतील, या उद्देशाने त्यांना शिक्षित करावे, असे प्रतिपादन विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे यांनी व्यक्त केले.

शीख धर्माचे दहावे गुरू गोविंद यांचे सुपुत्र साहिबजादा बाबा जोरावर सिंहजी आणि साहिबजादा बाबा फतेह सिंहजी यांच्या सर्वोच्च बलिदानाच्या स्मृतिप्रित्यर्थ देशभर वीर बाल दिवस पाळला जातो. त्यानिमित्ताने विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग आणि ज्ञानस्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वीर बाल दिवस कार्यक्रमप्रसंगी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील व विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

डॉ. मनिषा कोडापे पुढे म्हणाल्या, आजच्या पिढीला सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत. पालक सुद्धा आपल्या मुलांची अधिक जास्त काळजी घेतात, असे असले तरी, मुलांनी सोशल मिडीयाचा योग्य मूल्यांसाठी वापर करावा. त्यांनी चांगले ज्ञान संपादित करून आपले करिअर घडवावे व देशाच्या विकासासाठी सदैव तयार रहावे, असे त्यांनी सांगितले.

तसेच डॉ. श्रीकांत पाटील म्हणाले, औरंगजेबने केलेल्या अन्यायाला शीख समुदायाने समर्थपणे तोंड दिले.

### गाडगे बाबांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवावे

अध्यक्षीय भाषणात डॉ. वैशाली गुडधे म्हणाल्या, २०२२ पासून वीर बाल दिवस हा कार्यक्रम सुरु झाला आहे. साहिबजादा बाबा जोरावर सिंहजी आणि साहिब जादा बाबा फतेह सिंहजी हे मृत्युमुखी पडले, त्यांची देशभक्ती त्यातून दिसून येते. पालकांसाठी सुद्धा ही घटना महत्वाची आहे. आपल्या मुलांना कशाप्रकारे संस्कार व मूल्ये द्यावीत, याचा बोध या घटनेतून मिळतो. यावेळी छत्रपती संभाजी महाराज आणि कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

शीख समुदायाने मोठा इतिहास घडविला असून आजच्या विद्यार्थ्यांनी वीर बालकांपासून प्रेरणा घ्यावी, त्यांनी चांगले ज्ञान संपादित करून आपले करिअर घडवावे असेही त्यांनी सांगितले.

---

आपली मातृभूमि

# ग्रामीण भारतापुढील आव्हाने समजून घेणे काळाची गरज

❊ जयदीप हर्डीकर यांचे प्रतिपादन ❊ डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमाला

प्रतिनिधी/२७ डिसेंबर



अमरावती : ग्रामीण भारत आज अनेक गंभीर आव्हानांचा सामना करीत आहे. जागतिकीकरण, आर्थिक विषमता, हवामान बदल ही आजच्या काळातील प्रमुख आव्हाने आहेत. ग्रामीण भागातील समस्यांवर आज अभ्यास करणे गरजेचे असून ग्रामीण भागातील समस्या सोडविण्यासाठी केवळ शासनच नव्हे, तर नागरिकांनी ही जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे, असे आवाहनात्मक प्रतिपादन अभ्यासक व मुक्त पत्रकार श्री जयदीप हर्डीकर यांनी केले. 'ग्रामीण भारतातील सद्यस्थिती व आव्हाने' या विषयाची मांडणी करतांना ते बोलत होते. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था व नियमन केंद्र आणि श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानप्रसंगी व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. जयवंत पुसदेकर, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास कुलट व नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे उपस्थित होते. विषयाची मांडणी करतांना श्री जयदीप हर्डीकर म्हणाले, आजच्या प्रसारमाध्यमांवरील वादविवाद बघितले तर आपल्या देशासमोर कुठल्याच समस्या नाहीत असे दिसते. ग्रामीण भागातील प्रश्नांना योग्य कव्हरेज मिळत नाही, जोपर्यंत आपण ग्रामीण भागाला समजून घेत नाही, तोपर्यंत आपल्याला देशाचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक वारसा उमजणार नाही. शेतक-यांसमोर अनेक समस्या आहेत. तो कर्जबाजारी का झाला, आत्महत्या का करीत आहे हे प्रश्न शासनासह जनतेने सुध्दा समजून घेतले पाहिजे. अमरावती व यवतमाळ जिल्हे सर्वाधिक आत्महत्याग्रस्त जिल्हे म्हणून ओळखले जातात. त्यांनी कर्जबाजारी शेतक-यांच्या होणा-या दुरावस्थेचे उदाहरण देतांना चंद्रपूर जिल्ह्यातील शेतक-याला कर्ज फेडण्याकरिता किडनी विकावी लागल्याची धक्कादायक घटना सांगितली. सध्या शहराचा खूप लाड चालला आहे. मेट्रो, चकचकीत रस्ते, स्वस्त भाजीपाला, फाईव्ह-जी, सुविधा यांसारख्या आधुनिक सुविधा पुरविल्या जातात. मात्र दुसरीकडे ग्रामीण भागात आजही शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणी व वीज आदी मूलभूत सुविधांचा अभाव दिसून येतो. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील विषमतेची दरी अधिक वाढत आहे. शेतकरी जगतात कसे, नवीन युवकांना शेती का करावीशी वाटत नाही, त्यांच्यात शेतीविषयी अनास्था निर्माण होत असल्यामुळे तो भाग अस्थिर होत असल्याचे ते म्हणाले. भारतातील बहुतांश शेती पावसावर अवलंबून आहे. पण निसर्गाचे झालेले असंतुलन, हवामान बदल यामुळे देशात कधी दुष्काळ, तर कधी मोठ्या प्रमाणावर पाऊस यामुळे पिकांचे आणि शेतीचे अतोनात नुकसान होत आहे.


जनमाध्यम

# विद्यार्थ्यांनी मूल्यांची जपवणूक व कर्तव्यांची जाणीव ठेवावी- डॉ.मनिषा कोडापे

## विद्यापीठात वीर बाल दिवसाचे आयोजन

**अमरावती/का.प्र**

इतिहास हा भावी पिढीला दिशादर्शक असतो. इतिहासातून आपण काय घेतले पाहिजे, हे महत्वाचे असून विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्याकरीता मूल्यांची जपवणूक आणि आपल्या कर्तव्यांची जाणीव या गोष्टींना आपल्या जीवनात सर्वोच्च महत्व दिले पाहिजे. पालकांनी आपले पाल्य संस्कारक्षम कसे होतील, या उद्देशाने त्यांना शिक्षित करावे, असे प्रतिपादन विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे यांनी व्यक्त केले. शीख धर्माचे दहावे गुरू गोविंद यांचे सुपूत्र साहिबजादा बाबा जोरावर सिंहजी आणि साहिबजादा बाबा फतेह सिंहजी यांच्या सर्वोच्च बलिदानाच्या स्मृतिप्रित्यर्थ देशभर वीर बाल दिवस संपन्न होतो. त्यानिमित्ताने विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग आणि ज्ञानस्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वीर बाल दिवस कार्यक्रमप्रसंगी मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या.



यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ.वैशाली गुडधे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील व विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते. डॉ. श्रीकांत पाटील म्हणाले, औरंगजेबने केलेल्या अन्यायाला शीख समुदयाने समर्थपणे तोंड दिले. शीख समुदायाने मोठा इतिहास घडविला असून आजच्या विद्यार्थ्यांनी वीर बालकांपासून प्रेरणा घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात डॉ. वैशाली गुडधे म्हणाल्या, २२ डिसेंबर, २०२२ पासून वीर बाल दिवस हा कार्यक्रम सुरु झाला आहे. साहिबजादा बाबा जोरावर सिंहजी आणि साहिबजादा बाबा फतेह सिंहजी हे मृत्युमुखी पडले, त्यांची देशभक्ती त्यातून दिसून येते. पालकांसाठी सुद्धा ही घटना महत्वाची असून आपल्या मुलांना कशाप्रकारे संस्कार व मूल्ये द्यावीत, याचा बोध या घटनेतून मिळतो. यावेळी छत्रपती संभाजी महाराज आणि कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.प्रास्ताविक व संचालन विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी, तर आभार विशाल बापते यांनी मानले. विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्य नगरी

## विद्यापीठात भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती



अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती सुशासनदिन म्हणून साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्या वतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनीषा कोडापे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर यांनी केले.

प्रतिदिन अखबार

## विद्यापीठ में मनाई संत संताजी जगनाडे महाराज जयंती



प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार

अमरावती, 8 दिसंबर- संगाबा अमरावती विद्यापीठ में महाराष्ट्र की संत परंपरा के महान संत श्री संत जगनाडे महाराज की जयंती उत्साह से मनाई गई. इस अवसर पर कुलसचिव डॉ. अविनाश असनारे ने जगनाडे महाराज के तैलचित्र का पूजन करके माल्यार्पण व विद्यापीठ की ओर से अभिवादन किया. जयंती कार्यक्रम में विद्यापीठ के अधिकारी व कर्मचारी बड़ी संख्या में उपस्थित थे. श्री संत जगनाडे महाराज के जीवन कार्यों की जानकारी जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर ने दी.

TheHitavada

## SGBAU students to represent Mah, Goa at National Integration Camp

■ Amravati Bureau
AMRAVATI, Dec 17

SANT Gadgebaba Amravati University has received the honour and the opportunity to represent both Maharashtra and Goa at the ensuing National Integration Camp, organised by the Ministry of Youth Affairs and Sports, Government of India. Total of 10 volunteers from SGBAU will participate in the seven-day camp, conducted under the National Service Scheme (NSS), to be held from December 25 to 31, 2025 at S S Jain Subodh, P G College, Rambagh Circle, Jaipur, Rajasthan.

Volunteers from 11 States across the country will participate, making it a prestigious national-level event.

The NSS Department of the University has been continuously working to instill values of national unity, patriotism, religious harmony, tolerance and social responsibility among students through various awareness and community-oriented activities.

Students regularly take part in programmes such as commemorative events of national leaders, cleanliness drives, workshops, camps and several government initiatives.



The 10 volunteers participating in the training camp

The selected team of volunteers includes Rohan Wankhade, Prof Ram Meghe College of Engineering and Management, Badnera, Hima-nshu Rathi, G S Science, Arts and Commerce College, Khamgaon, Eknath Kale, Gulab Nabi Azad College of Social Work, Pusad, Krishna Ghardeenkar, Arts and Commerce College, Bori Arab, Kunal Ingle, Mahatma Jyotiba Phule College, Amravati, Priyanka Mhaske, Shri Vasantrao Naik College, Dharni, Vijaya Aswar, Shri Shivaji Arts, Commerce and Science College, Akot, Vaibhavi Morganje, Shri Shivaji Science and Arts College, Chikhli, Vaishnavi Panzhade, Shri Ramrao Sarnaik College of Social Work, Washim and Sanskruti Kharde, Takshashila Institute of Engineering and Technology, Daryapur.

A team of 10 volunteers will travel to Jaipur for the camp under the guidance of Dr Milind Barhate, Vice-Chancellor and Dr Nilesh Kadu, NSS Director.

The contingent will be managed by Dr Harshali Wankhade, NSS Programme Officer, Shri Shivaji Science College, Amravati. Dr Milind Barahate praised all selected volunteers. Dr Mahendra Dhore, Pro-Vice-Chancellor, Dr Avinash Asnare, Registrar and Dr Nilesh Kadu also extended their best wishes to the team.

## पुण्य नगरी

# विद्यापीठाच्या वतीने 'जीवनाचे प्रभावी व्यवस्थापन' विषयावर कार्यशाळा

अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र आणि श्रीरामकृष्ण विवेकानंद समिती, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व नैतिक मूल्यांची वाढ करण्याच्या दृष्टीने 'जीवनाचे प्रभावी व्यवस्थापन' या महत्त्वपूर्ण विषयावर नुकतीच एकदिवसीय कार्यशाळा पार पडली.



कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनीषा कोडापे, तर प्रमुख अतिथी म्हणून श्रीरामकृष्ण मिशन, वडोदरा, गुजरात येथील श्रीमत स्वामी अनंतरानंद, सिम्बॉसिस महाविद्यालय, पुणेचे सेवानिवृत्त विभागप्रमुख डॉ. शिरीष लिमये, स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. योगेश्वर कुरवाडे रामकृष्ण विवेकानंद समितीचे उपाध्यक्ष प्रमोद देशमुख आदी उपस्थित होते. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात श्रीरामकृष्ण मिशन, वडोदरा, गुजरात येथील श्रीमत स्वामी अनंतरानंद यांनी तुम्हीच तुमच्या भाग्याचे निर्माते आहात या विषयावर, तर दुसऱ्या सत्रात सिम्बॉसिस महाविद्यालय, पुणेचे सेवानिवृत्त विभागप्रमुख डॉ. शिरीष लिमये यांनी सकारात्मक दृष्टिकोन या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले. प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मान्यवरांनी समर्पक उत्तरे देऊन त्याचे महत्त्व पटवून दिले. शेवटच्या सत्रात कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदविल्याबद्दल उपस्थित विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

## नवराष्ट्र

# आजचे विद्यार्थी हे उद्याचे संशोधक व उद्योजक

### प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे प्रतिपादन



▶ अमरावती, ब्युरो. आजचे विद्यार्थी हे उद्याचे संशोधक आणि उद्योजक आहेत. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील समस्या सोडवण्याची क्षमता विकसित होते, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील इन्क्युबेशन फाऊंडेशन, आय.क्यू.ए.सी. व मेधावाटिका अँडलॅब्स प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित ज्युनियर हॅकेथॉनमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता अमरावतीचे उपायुक्त द. ल. ठाकरे, इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. ज्युनियर श्रेणीमध्ये समर्थ हायस्कूलचा विद्यार्थी समर्थ देवगिरीकर, तुषार सोपान काजे यांना प्रथम व ३ हजार रुपये रोख, शिवाजी मल्टीपर्पज उच्च माध्यमिक शाळेचे विद्यार्थी अद्वेता चौधरी, सोहम माहुलकर द्वितीय व २ हजार रुपये रोख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालयाचा विद्यार्थी भावेश गोपाल सोसे, नमन सोनारे, आदित्य तायडे यांना तृतीय बक्षिस व एक हजार रुपये रोख, गणुजी बापुजी भोकरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रदान करण्यात आले. सिनियर श्रेणीमध्ये मणिबाई गुजराती हायस्कूलचे विद्यार्थी ओम देशमुख, समर्थ विधाते, श्रावण कोंडे यांना प्रथम बक्षीस व ३ हजार रुपये रोख, शिवाजी मल्टीपर्पज उच्च माध्यमिक शाळेचे विद्यार्थी प्रेम घरडे द्वितीय व २ हजार रुपये रोख, गुरुकुल इंग्लिश मिडियम स्कूल, दिग्रसचे विद्यार्थी अर्जुन दुधाने, अजय राठोड, अथर्व रुद्राक्षवार यांना तृतीय व १ हजार रुपये रोख अशोकराव हिरूळकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रदान करण्यात आले. तर प्रोत्साहनपर बक्षीस शाश्वत कन्सेप्ट स्कूलचा विद्यार्थी एकांश गवई, भव्य डेंबला यांना प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरूळकर, नरेश मोवाळे, रवी डेंगळे, प्रशिक्षणार्थी भावेश वारके, प्रज्वल वानखडे, कोमल काळबांडे, मेधावाटिकाचे डॉ. केतकी काळेले, राहुल चुटे यांनी सहकार्य केले.

## देशोन्नती

# आजचे विद्यार्थी हे उद्याचे संशोधक व उद्योजक

- प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे प्रतिपादन
- विद्यापीठाच्या ज्युनिअर हॅकेथॉनमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना



देशोन्नती वृत्तसंकलन

अमरावती - आजचे विद्यार्थी हे उद्याचे संशोधक आणि उद्योजक आहेत आणि अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील समस्या सोडवण्याची क्षमता विकसित होते, असे प्रतिपादन अध्यक्षीय भाषणातून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील इन्क्युबेशन फाऊंडेशन, आय.क्यू.ए.सी. व मेधावाटिका अँडलॅब्स प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित ज्युनिअर हॅकेथॉनमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता अमरावतीचे उपायुक्त द. ल. ठाकरे, इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्यात. ज्युनिअर श्रेणीमध्ये श्री समर्थ हायस्कूल, अमरावतीचे विद्यार्थी समर्थ देवगिरीकर, तुषार सोपान काजे यांना प्रथम व ३ हजार रुपये रोख, शिवाजी मल्टीपर्पज उच्च माध्यमिक शाळेचे विद्यार्थी अद्वेता चौधरी, सोहम माहुलकर द्वितीय व २ हजार रुपये रोख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय, पिंपरी ता. चांदूरबाजारचे विद्यार्थी भावेश गोपाल सोसे, नमन सोनारे, आदित्य तायडे यांना तृतीय बक्षीस व एक हजार रुपये रोख स्व. गणुजी बापुजी भोकरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रदान करण्यात आले.

तसेच सिनिअर श्रेणीमध्ये मणिबाई गुजराती हायस्कूलचे विद्यार्थी ओम देशमुख, समर्थ विधाते, श्रावण कोंडे यांना प्रथम बक्षीस व ३ हजार रुपये रोख, शिवाजी मल्टीपर्पज उच्च माध्यमिक शाळेचे विद्यार्थी प्रेम घरडे द्वितीय व २ हजार रुपये रोख, गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल, दिग्रसचे विद्यार्थी अर्जुन दुधाने, अजय राठोड, अथर्व रुद्राक्षवार यांना तृतीय व एक हजार रुपये रोख स्व. अशोकराव हिरूळकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रदान करण्यात आले. प्रोत्साहनपर बक्षीस शाश्वत कन्सेप्ट स्कूलचे विद्यार्थी एकांश गवई, भव्य डेंबला यांना प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरूळकर, नरेश मोवाळे, रवी डेंगळे, प्रशिक्षणार्थी भावेश वारके, प्रज्वल वानखडे, कोमल काळबांडे, मेधावाटिकाचे डॉ. केतकी काळेले, राहुल चुटे यांनी सहकार्य केले.

# नवभारत

**| उपलब्धि |** जूनियर हैकेथॉन में बच्चों की प्रतिभा चमकी, शोध मॉडल्स की प्रदर्शनी

## छात्रों की कल्पनाशक्ति को पंख : बाराहाते

■ अमरावती, ब्यूरो. संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय के उपकुलपति डॉ. मिलिंद बाराहाते ने कहा कि स्कूली उम्र में ही छात्रों ने अपनी कल्पनाशक्ति से परे जाकर तैयार किए गए विभिन्न विषयों पर शोध मॉडल्स प्रस्तुत किए. प्रदर्शनी में रखे गए इन मॉडल्स को देखकर ऐसा महसूस हुआ मानो बच्चों की कल्पनाओं को सचमुच पंख लग गए हों. ऐसे प्रतिभावान विद्यार्थी भविष्य में निश्चित ही ऊंची उड़ान भरेंगे.

**शोध आधारित मॉडल्स ने खींचा दर्शकों का ध्यान :** संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय की पहल पर स्कूली विद्यार्थियों के लिए जूनियर हैकेथॉन 2025 प्रतियोगिता आयोजित की गई. कक्षा 5वीं से 10वीं तक के विद्यार्थियों ने स्पर्धा में भाग लेते हुए अपनी-अपनी रचनात्मक सोच से तैयार किए गए विभिन्न विषयों पर आधारित शोध मॉडल्स प्रस्तुत किए. उद्घाटन उपकुलपति डॉ. बाराहाते के हाथों हुआ. मनपा आयुक्त डॉ. सौम्या शर्मा (चांडक) प्रमुख अतिथि के रूप में उपस्थित थीं. डॉ. बाराहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तथा आयुक्त डॉ. सौम्या शर्मा (चांडक) ने सभी मॉडल्स का अवलोकन कर छात्रों से बातचीत की तथा उनकी अवधारणाओं और मॉडल्स के उपयोगिता संबंधी जानकारी प्राप्त की. विद्यार्थियों ने भी अपने मॉडल्स कैसे काम करते हैं और समाज के लिए कितने उपयोगी हो सकते हैं, इसकी विस्तृत जानकारी मान्यवरों को दी. यह प्रतियोगिता विश्वविद्यालय के इन्क्यूबेशन सेंटर और मेधावाटिका स्टार्टअप के संयुक्त तत्वावधान में आयोजित की गई थी. इसमें टेक्नोलॉजी एंड डिजिटल इनोवेशन, एन्वायरनमेंट एंड सस्टेनेबिलिटी, हेल्थ एंड वेलबीइंग तथा ओपन थीम जैसे विषयों के अंतर्गत मॉडल्स प्रस्तुत किए गए. कार्यक्रम में इन्क्यूबेशन सेंटर की संचालक डॉ. स्वाति शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव तथा सभी अधिकारी-कर्मचारी उपस्थित थे.



### विवि के प्रयास जारी

उपकुलपति डॉ बाराहाते ने भी आईटी पार्क के लिए विश्वविद्यालय द्वारा किए जा रहे प्रयासों की जानकारी दी और बताया कि इस संबंध में प्रस्ताव शासन को भेजा जा चुका है. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तथा इन्क्यूबेशन सेंटर की संचालक डॉ. स्वाति शेरेकर ने भी आयुक्त को विभिन्न उपक्रमों की जानकारी दी

### अमरावती में आईटी पार्क की आवश्यकता : आयुक्त शर्मा

- कार्यक्रम के दौरान शहर के विकास को लेकर एक महत्वपूर्ण चर्चा भी हुई. मनपा आयुक्त डॉ.
- सौम्या शर्मा (चांडक) ने कहा कि अमरावती में आईटी पार्क की स्थापना समय की आवश्यकता है.
- उन्होंने यह भी कहा कि स्कूली स्तर से ही विद्यार्थियों को प्रगल्भ बनाने की आवश्यकता है, जिससे वे भविष्य में अपने उज्ज्वल करियर का निर्माण कर सकें.

# नवराष्ट्र

## विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार दिन व मानवाधिकार दिन उत्साहात





### श्रमदान उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय

प्रतिनिधी/११ डिसेंबर

अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन व मानवाधिकार दिन विशेष उपक्रमाने साजरा करण्यात आला. सामाजिक दायित्व, पारदर्शकता आणि मानवी मूल्यांचा संदेश पोहोचविण्याच्या उद्देशाने विभागाच्यावतीने विद्यापीठ परिसरात विद्यार्थ्यांनी श्रमदान करून सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय आणून दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक होते.

ध्यक्षीय भाषणात डॉ. के.बी. नायक म्हणाले, भ्रष्टाचार देशाच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीला बाधा आणतो, त्यामुळे तरुणांनी प्रामाणिकपणा, नैतिकता, उत्तरदायित्वाची भावना बाळगून समाजनिर्मितीत सक्रिय भूमिका घेतली पाहिजे.

मानवी अधिकार हे प्रत्येकाचे जन्मसिद्ध हक्क आहेत, त्यांचे संरक्षण सर्वांच्याच उत्तरदायित्वाचा विषय आहे. यावेळी कायदे, संविधानातील तरतुदी आणि मानवाधिकारांच्या मूलभूत संकल्पना समजावून सांगत, समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी विद्यार्थीच प्रमुख शक्ती असल्याचे डॉ. नायक म्हणाले. याप्रसंगी सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, संशोधक, अध्यापक यांनी परिसरात स्वच्छता, कचरा व्यवस्थापन जनजागृती, स्वच्छ परिसर अभियान, वृक्षतळ साफसफाई, श्रमदान असे विविध उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय आणून दिला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मानवाधिकार दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना मानवाधिकारांची व्याप्ती, संरक्षण करणाऱ्या संस्था, संयुक्त राष्ट्रांच्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी सुध्दा भ्रष्टाचार विरोधी संकल्पना, मानवाधिकार संरक्षण, समाजातील नैतिक मूल्यांविषयी विशेष दखल घेतली. संचालन कु. एन.एन.काळे, तर आभार कु. सावी भगत हिने मानले. कार्यक्रमाला विभागातील प्राध्यापकवृंद डॉ. प्रशांत भगत, डॉ. रोहिणी देशमुख, डॉ. रोहिणी वावरे, प्रा.साधना इंगोले, प्रा. सुनिता इंगळे, श्री प्रवीण गडलिंगकर, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिव्य मराठी

॥ समाज-संस्था ब्रीफ ॥

## विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन



अमरावती । संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन व मानवाधिकार दिन विशेष उपक्रमाने साजरा करण्यात आला. सामाजिक दायित्व, पारदर्शकता आणि मानवी मूल्यांचा संदेश पोहोचविण्याच्या उद्देशाने विभागाच्यावतीने विद्यापीठ परिसरात विद्यार्थ्यांनी श्रमदान करुन सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय आणून दिला. कार्यक्रमाला विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक, डॉ. प्रशांत भगत, डॉ. रोहिणी देशमुख, डॉ. रोहिणी वावरे, प्रा.साधना इंगोले, प्रा. सुनिता इंगळे, प्रवीण गडलिंगकर, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठा संख्येने उपस्थित होते.

## विद्यापीठातील संस्कृत विभागाचे दोन विद्यार्थी गुणवत्ता यादीत



अमरावती : विद्यापीठातील संस्कृत विभागाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम व द्वितीय येण्याचा मान पटकावून विद्यापीठाचे तसेच संस्कृत विभागाचे नाव उंचावले. अमृता कोरडे प्रथम, तर डॉ.राजीव मुलमुले यांनी द्वितीय स्थान प्राप्त केले आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विभागाच्या समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख, प्रा. डॉ. राहुल लोधा, प्रा. स्वप्ना यावले, प्रा. श्वेता बडगुजर, प्रा.प्रियंका गावंडे, प्रा. आकाश हरणे आदींनी कौतुक केले. आई-वडीलांसह शिक्षक व विद्यापीठ प्रशासनप्रति यावेळी विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

## आंतरविद्यापीठ हॅण्डबॉल स्पर्धेकरिता संघ घोषित

अमरावती : युनिव्हर्सिटी ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट, जयपूर येथे ८ ते १२ जानेवारी, २०२६ दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ हॅण्डबॉल (पुरुष) स्पर्धेकरिता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. चमूमध्ये वेदांत वऱ्हाडे, श्रेयस कांबळे, राजकुमार कासदेकर, कार्तिक मरसकोल्हे, कैलाश ठाकरे, वेदांत पंचबुद्धे, सुभान मुन्नीवाले, अभिषेक काळे, मंगेश इंगळे, आदित्य सिरसाट, रवी भुशनवार, बंटी साहू, अनिकेत जाधव, जीवन पवार, तेजस हरमकर, देवांग भोंडे, अमेय पोटे, दर्शन सलामे, रामक्रिष्ण चिकार याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी कौतुक केले. चमूंचा प्रशिक्षण वर्ग डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती येथे २७ डिसेंबर ते ५ जानेवारीदरम्यान होणार आहे. याकरिता खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे.

नवभारत

खेल-जगत : अमरवती विद्यापीठ में विद्यार्थियों का हुआ सम्मान

## हैकाथॉन के विजेताओं का पुरस्कार

■ अमरावती, ब्यूरो. विद्यापीठ के इन्क्यूबेशन फाउंडेशन, आईक्यूएसी तथा मेधावाटिका एडलवेक्स प्रा. लि. के संयुक्त तत्वावधान में कक्षा पांचवीं से दसवीं तक के विद्यार्थियों के लिए आयोजित जूनियर हैकाथॉन के विजेता विद्यार्थियों का पुरस्कार वितरण समारोह संपन्न हुआ. मंच पर अध्यक्ष के रूप में विद्यापीठ के प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित थे. प्रमुख अतिथि के तौर पर कौशल विकास, रोजगार एवं उद्यमिता उपायुक्त द. ल. ठाकरे तथा इन्क्यूबेशन सेंटर की संचालक डॉ. स्वाती शेरेकर मौजूद रहीं. इस अवसर पर मान्यवरों ने



सभी विद्यार्थियों की सराहना की. जूनियर श्रेणी में समर्थ हाईस्कूल, अमरावती के विद्यार्थी समर्थ देवगिरीकर, तुषार सोपान काजे, शिवाजी मल्टीपर्पज उच्च माध्यमिक विद्यालय के विद्यार्थी अद्वेता चौधरी, सोहम माहुलकर को द्वितीय पुरस्कार तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय, पिंपरी के विद्यार्थी भावेश गोपाल सोसे, नमन सोनारे, आदित्य तायडे को तृतीय पुरस्कार स्व. गणुजी बापुजी भोकरे की स्मृति में प्रदान किया गया. सीनियर श्रेणी में मणिबाई गुजराती हाईस्कूल के विद्यार्थी ओम देशमुख, समर्थ विधाते, श्रावण कोंडे को प्रथम पुरस्कार प्रदान किया गया. शिवाजी मल्टीपर्पज उच्च माध्यमिक विद्यालय के विद्यार्थी प्रेम चहाटे को द्वितीय तथा गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल, दिग्रस के विद्यार्थी अर्जुन दूधाने, अजय राठोड, अर्थव रुद्राक्षवर को तृतीय पुरस्कार प्रदान किए गए. इसके अलावा प्रोत्साहन पुरस्कार एकांश गवई (डेंबला) को प्रदान किया गया.

हिंदुस्थान

# विद्यापीठात माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती सुशासन दिन म्हणून साजरी



अमरावती दि. २५ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात माजी पंतप्रधान भारतरत्न श्री अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती सुशासन दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व श्री अटल बिहारी वाजपेयी यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर यांनी दिली.

# बेघर बांधवांच्या मदतीसाठी विद्यापीठ सदैव तत्पर : कुलगुरू

## विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांची आधार केंद्राला सदिच्छा भेट




अमरावती दि. २५ : व्यक्तींना बेघर करणे ही गंभीर समस्या असून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने कुलगुरू या नात्याने मला या बेघर बांधवांसाठी जी काही मदत करायची आहे, ती मी नक्कीच करेल. या बेघर बांधवांच्या मदतीसाठी विद्यापीठ सदैव तत्पर असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. बडनेरा स्थित आधार शहरी बेघर लोकांच्या निवारा केंद्राला कुलगुरूंनी सदिच्छा भेट दिली, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी भारतीय जैन समाज संघटनेचे अध्यक्ष श्री सुदर्शन गांग, प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गोविंद कासट, विदर्भ कुष्ठरोगी सेवा संस्था, तपोवनचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई, विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त असलेले डॉ. प्रफुल्ल गवई, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर, बार्टीच्या प्रकल्पाधिकारी अनिता गवई आदी मान्यवर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी आधार केंद्रातील व्यवस्थापन व स्वच्छतेबाबत आधार केंद्राच्या व्यवस्थापक कु. ज्योती राठोड आणि पब्लिक एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष तथा आधार केंद्राचे संचालक श्री राजे बसवनाथे यांचे कौतुक करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्यात. तसेच आधार केंद्र बेघर बांधवांसाठी चांगले कार्य करीत असून त्यांच्या मदतीसाठी विद्यापीठ सदैव तत्पर असल्याचेही त्यांनी सांगितले.

भारतीय जैन समाज संघटनेचे अध्यक्ष श्री सुदर्शन गांग, प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गोविंद कासट, विदर्भ कुष्ठरोगी सेवा संस्था, तपोवनचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई, विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त असलेले डॉ. प्रफुल्ल गवई, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर, बार्टीच्या प्रकल्पाधिकारी अनिता गवई, ज्येष्ठ समाजसेवक जवाहर गांग यांनी सुद्धा या निवारा बेघर बांधवांसाठी मदतीचा हात देण्यास सदैव तत्पर असल्याचे मनोगतातून सांगितले.

सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करण्यात आले. अमरावती महानगरपालिकेच्या राष्ट्रीय उपजीविका अभियानांतर्गत पब्लिक एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटी द्वारा संचालित आधार शहरी बेघर लोकांसाठी निवारा केंद्राला सदिच्छा भेट दिल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्योती राठोड, सूत्रसंचालन राजू बसवनाथे यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. सुभाष गवई यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोहित घोंगडे, विलास घोराव, किशोर मरकाम व निवारावासीयांनी अथक परिश्रम घेतले.

वृत्त केसरी

# ग्रामीण भारतापुढील आव्हाने समजून घेण्याची गरज

जयदीप हर्डीकर यांचे प्रतिपादन



प्रतिनिधी/वृत्त केसरी

अमरावती, २५ : ग्रामीण भारत आज अनेक गंभीर आव्हानांचा सामना करीत आहे. नागरिकीकरण, आर्थिक विषमता, हवामान बदल ही आजच्या काळातील प्रमुख आव्हाने आहेत. ग्रामीण भारतातील समस्यांवर आज अभ्यास करणे गरजेचे असून ग्रामीण भागातील समस्या सोडविण्यासाठी केवळ शासनच नव्हे, तर नागरिकांनी ही जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जयदीप हर्डीकर यांनी केले.

'ग्रामीण भारतातील सद्यस्थिती व आव्हाने' यविषयावरील मांडणी करताना ते बोलत होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था व नियमन केंद्र आणि श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानप्रसंगी व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. जयवंत पुसदेकर, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास कुलट व नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे उपस्थित होते. जयदीप हर्डीकर म्हणाले की, आजच्या प्रसारमाध्यमांमधील चर्चाविश्व बघितले तर देशासमोर कुठल्याच समस्या नाहीत असे दिसते. ग्रामीण भारतातील प्रश्नांना योग्य कव्हरेज मिळत नाही. जोपर्यंत आपण ग्रामीण भारत समजून घेत नाही, तोपर्यंत देशाचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक वारसा उमजणार नाही. शेतक-यांसमोर अनेक समस्या आहेत. तो कर्जबाजारी का झाला, आत्महत्या का करीत आहे हे प्रश्न शासनासह जनतेने सुध्दा समजून घेतले पाहिजे. दुसरीकडे ग्रामीण भारत आजही शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणी व वीज अशा मूलभूत सुविधांचा अभाव दिसून येतो. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील विकासाची दरी अधिक वाढत आहे. शेतकरी जगला तरच, नवीन युवकांना शेती का करावीशी वाटत नाही. त्यांच्या शेतीविषयी अनास्था निर्माण होत असल्यामुळे तो भाग अस्थिर होत असल्याचे ते म्हणाले. शेतमालाला कमी भाव त्यामुळे शेतकरी अनुत्पादक ठरत गेला. ग्रामीण भागातील जनता शहरी भागातील जीवनशैलीचे अनुकरण करताना त्यांच्या महत्त्वाकांक्षा मुख्य बनतात. एकीकडे जगाचा आर्थिक खेळ चालत आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण भागाचा विकास मागे पडताना दिसून येतो. भारत हा कृषीप्रधान देश असून शेतीतील उत्पन्नापेक्षा बिगर शेतीतील उत्पन्न अधिक असल्याचे दिसून येते. काही मोजक्याच लोकांकडे देशातील संपत्ती एकवटलेली असल्याचे चित्र अर्थव्यवस्था इतिहासामध्ये मोठी विषमता निर्माण करीत आहे. याला उपाय म्हणून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे पालकत्व शिक्षण संस्थाने स्वीकारले पाहिजे आणि नागरिकांनीही ग्रामीण भागातील सद्यस्थिती सुधारण्यासाठी आणि तेथील आव्हाने दूर करण्यासाठी जबाबदारी घ्यावी, असेही ते म्हणाले. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते म्हणाले, यवतमाळ व अमरावती सर्वात जास्त आत्महत्याग्रस्त जिल्हे म्हणून ओळखले जातात. शेतक-यांच्या उन्नतीसाठी शासनाने अनेक योजना राबविल्यात, पण आत्महत्या कमी होताना दिसत नाहीत. आत्महत्यांसाठी ग्राऊंड स्तरावर असलेल्या मुद्यांवर विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था व नियमन केंद्राच्यावतीने तज्ज्ञांच्या समितीचे संशोधन सुरू आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर विद्यापीठ ठोस उपाययोजना सूचविणार, त्यामुळे शेतक-यांच्या आत्महत्या कमी होतील, असा विश्वास कुलगुरूंनी याप्रसंगी व्यक्त केला. अध्यक्षीय भाषण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. जयवंत पुसदेकर यांनी केले. प्रास्ताविक व वक्त्यांचा परिचय डॉ. महेंद्र मेटे, स्वागतपर भाषण प्राचार्य अंबादास कुलट, संचालन डॉ. प्रवीण हरणकर, तर आभार डॉ. सुवर्णा गाडगे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ. श्रीकांत पाटील आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांची आधार केंद्राला भेट

पुण्यनगरी / प्रतिनिधी




अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी बडनेरा येथील आधार शहरी बेघर लोकांच्या निवारा केंद्राला सदिच्छा भेट दिली.

यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय जैन समाज संघटनेचे अध्यक्ष सुदर्शन गांग, प्रमुख अतिथी म्हणून गोविंद कासट, विदर्भ कुष्ठरोगी सेवा संस्था, तपोवनचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई, विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड, डॉ. प्रफुल्ल गवई, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर, बार्टीच्या प्रकल्पाधिकारी अनिता गवई आदी मान्यवर उपस्थित होते. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी आधार केंद्रातील व्यवस्थापन व स्वच्छतेबाबत व्यवस्थापक ज्योती राठोड आणि पब्लिक एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष तथा आधार केंद्राचे संचालक राजू बसवनाथे यांचे कौतुक केले. तसेच केंद्राच्या मदतीसाठी विद्यापीठ सदैव तत्पर असल्याचेही त्यांनी सांगितले. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करण्यात आले.

यावेळी केंद्राच्या वतीने कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्योती राठोड, संचालन राजू बसवनाथे तर आभार प्रदर्शन डॉ. सुभाष गवई यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोहित घोंगडे, विलास थोरात, किशोर मरकाम यांनी सहकार्य केले.

TheHitavada

# Programme held to mark death anniversary of Sant Gadge Baba

■ Amravati Bureau
AMRAVATI, Dec 23

A PROGRAMME to marked the death anniversary of Karmayogi Sant Gadge Baba was organised at the Sant Gadge Baba Study Centre of Sant Gadge Baba Amravati University, recently.

Dr Nitin Koli, Acting Registrar and Director of the Examination and Evaluation Board paid tribute on behalf of the university by offering flowers and performing ceremonial worship of the statue of Sant Gadge Baba. He also paid respects to the message sculpture of Sant Gadge Baba located in front of the main entrance of the university.



Dr Nitin Koli and others offering obeisance to the statue of Sant Gadgebaba.

Dr Prasad Wadegaonkar, former Pro-Vice-Chancellor, Pushkar Deshpande, Finance and Accounts Officer, Dr Shrikant Patil, Director of Department of Lifelong Learning and Extension, Dr Suhas Pachpande, Head of Computer Centre, Dr Dilip Kale, Head of Sant Gadge Baba Study Cente, Dr Mahant Sonpethkar, Head of Mahanubhav Study Centre, Dr Ratnashil Khobragade, Coordinator of Dr Babasaheb Ambedkar Ideology, Prof Dr Sanyogita Deshmukh, Prof Dr Pranav Kolte, Dr Mangesh Varkhede Deputy Registrar, Dr Sulabha Patil, Deputy Registrar, Monali Tote Patil, Deputy Registrar, Meenal Maldhure, Dr Sakshi Thakur, Rajesh Yedle, Deputy Engineer (Electrical), Anil Ghom, Garden Superintendent, Dr Vilas Nandurkar, Public Relations Officer along with many other university officers, faculty and staff members were present on the occasion.

The programme was conducted under the guidance of Dr Dilip Kale who also shared insights about the life, teachings and social contributions of Sant Gadge Baba.

देशोन्नती

# हँडबॉल पुरुष स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

■ ८ ते १२ जानेवारी २०२६ जयपूर येथे आयोजन

देशोन्नती वृत्तसंकलन

अमरावती : युनिव्हर्सिटी ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, जयपूर येथे ८ ते १२ जानेवारी, २०२६ दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ हँडबॉल (पुरुष) स्पर्धेकरिता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.






चमूमध्ये आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वेचा वेदांत वऱ्हाडे, हिंदी कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा मधुर ओगलेकर, श्रेयस कांबळे, राजकुमार कासदेकर, कार्तिक मरसकोल्हे व कैलाश ठाकरे, स्व. दादाराव अडसड शारीरिक शिक्षण महाविद्यालय, धामणगाव रेल्वेचा वेदांत पंचबुद्धे, सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडाचा सुभान मुन्नीवाले, अभिषेक वाळके व मनीष इंगळे, इंदिरा महाविद्यालय, कळंबचा आदित्य सिरसाट व रवी भुसनवार, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा बंटी साहू, अनिकेत जाधव, जीवन पवार व तेजस हरमकर, एस. एस. जी. एम. सी. ई. शेगांवचा देवांग भोंडे, सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, अमरावतीचा अमेय पोटे, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा दर्शन सलामे आणि श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा रामकिशन शिकार याचा समावेश आहे.

निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूचा प्रशिक्षण वर्ग डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती येथे २७ डिसेंबर, २०२५ ते ५ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित राहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांच्याशी संपर्क साधता येईल.

# विद्यापीठाचा हॅण्डबॉल पुरूष संघ झाला घोषित

क्रीडा

अमरावती, ब्युरो. जयपूर येथे युनिव्हर्सिटी ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे ८ ते १२ जानेवारीदरम्यान होणाऱ्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ हँडबॉल (पुरुष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. घोषित चमूमध्ये आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वेचा वेदांत वऱ्हाडे, हिंदी कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा मधुर ओगलेकर, श्रेयस कांबळे, राजकुमार कासदेकर, कार्तिक मरसकोल्हे व कैलाश ठाकरे, स्व. दादाराव अडसड शारीरिक शिक्षण महाविद्यालय, धामणगाव रेल्वेचा वेदांत पंचबुद्धे, सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडाचा सुभान मुन्नीवाले, अभिषेक वाळके व मनीष इंगळे, इंदिरा महाविद्यालय, कळंबचा आदित्य सिरसाट व रवि भुसनवार, शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय,




अमरावतीचा बंटी साहू, अनिकेत जाधव, जीवन पवार व तेजस हरमकर, एस. एस. जी. एम. सी. ई. शेगांवचा देवांग भोंडे, सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजीचा अमेय पोटे, शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा दर्शन सलामे आणि शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा रामकिशन शिकार याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी कौतुक केले. चमूचा प्रशिक्षण वर्ग डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात २७ डिसेंबर ते ५ जानेवारी दरम्यान होणार आहे.



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## विद्यावार्ता ई - मासिक

### मार्गदर्शक



**श्री आचार्य देवव्रत**

**मा. राज्यपाल तथा कुलपती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. मिलींद बारहाते**

**मा. कुलगुरू**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. महेंद्र ढोरे**

**मा. प्र-कुलगुरू**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### प्रकाशक



**डॉ. अविनाश असनारे**

**कुलसचिव**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### संपादक



**डॉ. विलास नांदुरकर**

**जनसंपर्क अधिकारी**